सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, ०७ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १६६ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्नितांडव! मुंबईतील कमला मिल कंपाऊंडमधील टाईम्स टॉवरला भीषण आग
### परिसरात धुराचे लोट; आगीचे कारण अस्पष्ट

मुंबई : काही दिवसांपूर्वी बोरिवली येथील २२ मजली गगनचुंबी इमारतीला भीषण आग लागली होती. या आगीत ४ नागरिक जखमी झाले होते. तर त्यातील एका वृद्ध नागरिकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. मुंबईतील आगीची ही घटना ताजी असताना पुन्हा अशीच घटना घडल्याचे समोर आले आहे. मुंबईतील लोअर परेल परिसरातील कमला मिल कंपाऊंडमधील टाईम्स टॉवरला भीषण आग लागल्याची घटना घडली आहे. या आगीमुळे संपूर्ण परिसरात काळ्याकुट्ट धुराचे लोट पसरल्यामुळे नागरिकांमध्ये सध्या भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी साडेसहा वाजेच्या दरम्यान लोअर परेल येथील कमला मिल परिसरातील टाइम्स टॉवरवरील एका मजल्याला अचानक आग लागली. काही क्षणातच मोठा भडका उडाल्यामुळे या आगीने रौद्र रुप धारण केले. संपूर्णरित्या ही काचेची बिल्डिंग असल्यामुळे आगीचा धूर आतमध्ये सर्व मजल्यांपर्यंत गेला. त्यानंतर धूर बाहेर जाण्यासाठी बिल्डिंगच्या काचा देखील फोडण्यात आल्या.

घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलिसांसह अग्निशमन दलाच्या ३ गाड्या दाखल झाल्या.







## श्री गणरायाचे आगमन आनंदाचे, समृद्धी-समाधानाचे पर्व घेऊन येवो - मुख्यमंत्री

मुंबई, ६ सप्टेंबर - श्री गणरायाचे आगमन राज्याच्या विकास चक्राला गती देण्यासाठी राबणाऱ्या प्रत्येकासाठी, शेतकरी, कष्टकरी, कामगार बांधवासाठी राज्यातील माता-भगिनींसाठी, आबाल-ज्येष्ठांसाठी आनंदाचे, आरोग्यदायी, समृद्धीचे, समाधानाचे पर्व घेऊन येवो अशी प्रार्थना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. श्री गणेश आगमनाच्या पुर्वसंध्येला मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी राज्यातील नागरिकांसह, जगभरातील तमाम गणेश भक्तांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. श्री गणेशांचे अखंड कृपाछत्र महाराष्ट्रावर राहावे, अशी मनोकामनाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी बाप्पा चरणी केली आहे.

शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री शिंदे म्हणतात, की श्री गणेशाचे आगमन दरवर्षी एक नवी ऊर्जा, प्रेरणा आणि उत्साह घेऊन येते. यातून मंगलमय, पवित्र वातावरण निर्माण होते. गणेशोत्सवातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडते. म्हणून जगाचेही महाराष्ट्राकडे लक्ष लागलेले असते. श्री गणेशाला कलाधिपती मानले जाते. त्यामुळे या उत्सव काळात कलाविष्कारालाही उधाण येतं. महाराष्ट्राचा काना कोपरा अशा अविष्कारांनी, उत्साह-जोश यांनी ओसंडून जातो. यंदाही आपण हा उत्सव उत्साहात, जल्लोषात आणि पावित्र्य राखून साजरा करूया. श्री गणेशाची मनोभावे सेवा करतानाच, आपण सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवूया.









## मीशोने ८.५ लाख मौसमी नोकऱ्या निर्माण केल्या

पुणे : सणासुदीच्या आधी, भारतातील एकमेव खरी ईकॉमर्स कंपनी, मीशो ने तिच्या विक्रेत्या आणि लॉजिस्टिक नेटवर्कवर ८.५ लाख मौसमी नोकऱ्या निर्माण केल्या आहेत, जे गेल्या वर्षीच्या तुलनेत ७० टक्के जास्त आहेत. ६० टक्के नोकऱ्या टियर ३ आणि टियर ४ शहरांमध्ये आहेत. सणासुदीची मागणी लक्षात घेऊन यावर्षी मीशो विक्रेत्यांकडून ५ लाख मौसमी कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली. त्यांना अल्पकालीन आणि व्यापक प्रशिक्षण दिले जात आहे जेणेकरून ते वर्गीकरण, उत्पादन आणि पॅकेजिंग इत्यादींमध्ये काम करू शकतील. याशिवाय विक्रेत्यांनी इतरही तयारी केली आहे. नवीन उत्पादने आणि उत्सव संग्रह नवीन श्रेणींमध्ये सादर केले गेले आहेत आणि वाढत्या ग्राहकांच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी इन्व्हेंटरी तपासणी देखील केली जात आहे.

## टी केअर हा नवीन उपक्रम सुरु केला

छत्रपती संभाजीनगर : खास अनुभव देऊन ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याच्या सतत प्रयत्नात, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज त्यांच्या मौल्यवान ग्राहकांना वाहनाच्या संपूर्ण मालकीचा अनुभव देण्याच्या उद्देशाने टी केअर हा नवीन उपक्रम सुरू करण्याची घोषणा केली आहे. टी केअर सुविधा एकाच ब्रँड अंतर्गत मूल्यवर्धित प्रस्तावासह ग्राहकांना विविध प्रकारचे साहाय्य देऊन, टोयोटाची विश्वासार्हता, गुणवत्ता आणि विशेष काळजी या मूलभूत मूल्यांचे प्रत्येक ग्राहकांशी असलेले संबंध प्रतिबिंबित करते.ग्राहक-केंद्रित दृष्टीकोनातून चालवलेली, टी केअर सुविधा विविध सेवा ऑफर करते जी ग्राहकांना आनंद देण्यासाठी आणि दीर्घकालीन संबंध वाढवण्यासाठी कंपनीचे समर्पण दर्शवते. विक्रीपूर्वी ते विक्रीनंतर आणि पुनर्खरेदीपर्यंत सर्व गोष्टींचा समावेश करून, टी केअर या ऑफर एका युनिफाइड ब्रँड अंतर्गत एकत्रित करते ज्यामध्ये खालील काही नावे समाविष्ट आहे,

## हयात प्लेस औरंगाबाद विमानतळाजवळ सुरु करण्याची घोषणा

छत्रपती संभाजीनगर : हयात हॉटेल्स कॉर्पोरेशनने आज हयात प्लेस औरंगाबाद विमानतळाजवळ सुरू करण्याची घोषणा केली आहे. हे हॉटेल महाराष्ट्र राज्यातील दुसरे हयात प्लेस हॉटेल आणि देशातील अकरावे हयात प्लेस हॉटेल म्हणून ओळखले जाणार आहे. यामुळे भारतीय बाजारपेठेतील ब्रँडचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित होते. १५० खोल्यांची मालमत्ता हयात प्लेस ब्रँडची अंतर्गत रचना, प्रासंगिक वातावरण आणि उन्नत सुविधांचे उदाहरण देते.

# सावधान ! पीएम विश्वकर्मा योजनेतून अर्ज करताय? शिलाई मशीनचा लाभ मिळणार नाही!

तभा वृत्तसेवा/सहयोग प्र.जावळे

कन्नड :- दि. तालुक्यात सध्या पीएम विश्वकर्मा योजनेचे अर्ज करण्यासाठी महिलांची रीघ लागली आहे

मात्र या योजनेचे निकष,अटी, काय आहेत याबाबत मात्र माहिती नसल्याने हे अर्ज बाद होत आहेत

शहरात तब्बल १३१८ अर्ज प्राप्त झाले असून ८०० अर्जांना कन्नड नगरपालिकेच्या स्तरावर मंजुरी देण्यात आली असून हे अर्ज चार स्तरावर याची मंजुरी झाल्यानंतर लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे, पण ही सर्व प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने असल्याने याबाबत अर्जदारांना पुरेशी माहिती नसल्याने खाजगी नेट कॅफे धारक मात्र हवे तसे



अर्ज करून मोकळे होत आहेत, या प्रक्रियेत मात्र सर्वसामान्य नागरिकांचे पैसे, वेळ,वाया जात आहे.

या योजनेची प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविली जात असल्याने नेट कॅफे धारक ग्रामीण भागातील नागरिकांचे अर्ज शहरात देत असल्याने मोठी पंचाईत होत आहे,त्यामुळे आगामी काळात सदर योजनेची माहिती घेऊनच अर्ज करावा

### योजना कोणत्या कारागिरांसाठी !

**ही योजना सुतार, लोहार, कुंभार, न्हावी, गटई कामगार, सुर्वणकार, टेलर, गवंडी, धोबी, चावी बनविणारे, विणकर, दोरी वळणारे, मासेमारीचे जाळे बनविणारे, शिल्पकार (मूर्ती बनविणारे) असे १८ व्यावसाय करणाऱ्या कारागिरांसाठी आहे.**

**या योजनेसाठी निकष काय?**

**कुटुंबातील एकाच व्यक्तीला या योजनेसाठी पात्र ठरविले जाणार, यापूर्वी लाभार्थ्याने कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ घेतलेला नसावा, लाभार्थी किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती सरकारी नोकरी करीत नसावा. लाभार्थीचे किमान वय हे १८ वर्षांहून अधिक असावे. पात्र लाभार्थ्यांना ५ दिवसांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षणात सहभागी लाभार्थ्यांना प्रतिदिन ५०० रुपयांचे विद्यावेतन, पीएम विश्वकर्मा प्रमाणपत्र, ओळखपत्र आणि साधने घेण्यासाठी (टूल किट) १५ हजार रुपये दिले जाणार आहेत**

पारंपरिक कारागिरांची आर्थिक उन्नती व्हावी यासाठी ही योजना असुन या प्रवर्गातील नागरिकांनी अर्ज करावे

पहिल्या स्तरावर नगरपालिका, ग्रामपंचायत,दुसऱ्या व तिसऱ्या स्तरावर कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता आयुक्तालय मंजुरी देणार आहेत यात या प्रवर्गातील लाभार्थी वगळता इतर लाभार्थ्यांना लाभ मिळणार नाही.

# ओला इलेक्ट्रिक वर फेस्टिव्ह ऑफर्स सुरू

छत्रपती संभाजीनगर : आज ओला इलेक्ट्रिकने सणासुदीच्या आधी आकर्षक डील आणि ऑफर जाहीर केल्या आहेत, ज्या अंतर्गत निवडक एस वन स्कूटर खरेदी करणाऱ्या ग्राहकांना ५००० रुपयांची सूट दिली जात आहे. ग्राहकांना निवडक बँकांच्या क्सेसरीज आणि क्रेडिट कार्ड ईएमआयवर ११,००० रुपयांपर्यंतचे अतिरिक्त फायदे देखील मिळतील. त्यांना १२,००० रुपयांपर्यंतचा एक्सचेंज बोनस देखील मिळू शकेल. ही ऑफर जवळच्या ओला इलेक्ट्रिक स्टोअरमध्ये उपलब्ध आहे आणि निवडक शहरांमध्ये १५ सप्टेंबरपर्यंत लागू असेल.

सर्व ओला इलेक्ट्रिक स्कूटर ८ वर्षे / ८०,००० किमी ची विस्तारित बॅटरी वॉरंटी कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय येते. या वाटचालीसह ओला इलेक्ट्रिकचे उद्दिष्ट इलेक्ट्रिक वाहनांचे आयुर्मान वाढवून इलेक्ट्रिक वाहनांचा अवलंब करण्यामधील एक मोठा अडथळा दूर करण्याचे आहे.

# कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल येथे शिक्षक दिन साजरा



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.५ सप्टेंबर

शहरातील कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल येथील शाळेत दि.५ सप्टेंबर या दिनी स्कूल येथे विद्यार्थ्यांनी शिक्षक दिन उत्साहात साजरा केला या शिक्षक दिनात एकदिवसीय मुख्याध्यापकाची अनंत मिसाळ या विद्यार्थ्याने भूमिका निभावली या दिनात शाळेच्या एकूण २२ विद्यार्थी शिक्षक व शिक्षिका सहभागी होऊन विद्यार्थ्यांना अध्यापना चे धडे दिले तसेच दुपारच्या सत्रात विद्यार्थी मुख्याध्यापक अनंत मिसाळ व उपमुख्याध्यापक सोहम चौधरी तसेच विद्यार्थी शिक्षक यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन केले.आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पुष्प व पेन देऊन त्यांचे स्वागत केले त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली आणि शाळेच्या शिक्षिका मनीषा पाटील,शीतल पवार यांनी विद्यार्थ्यांना शिक्षक कसा असतो त्याची भूमिका ते कशी निभावतो मुख्याध्यापक यांची कार्ये काय असतात असेल सखोल मार्गदर्शन त्यांनी केले.या कार्यक्रमाकरिता संस्थेचे प्रतिनिधी प्रा.कमलेश काळे,शाळेचे मार्गदर्शक प्रा.डॉ.दादासाहेब पवार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलीस,उपमुख्याध्यापक सागर घाटे, शाळेच्या शिक्षिका शीतल गावंडे,रोहिणी पाटील,निकिता देशमुख,मनीषा पाटील,शीतल पवार,अंजली कथलकर, शीतल काटोले,नम्रता पाटील,विद्या पाटील,आशा पंडित, प्रेरणा मोरे,संदीप निकम,नलिनी पाटील,हरीश कोळी,कीर्ती पाटील,शहादात्ता तडवी,संजय डापके,तौफिक पठाण, सुनीता जाधव,आदी कार्यक्रमासाठी उपस्थित होते.



# संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.६ सप्टेंबर

येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालय यात डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. त्यामध्ये इयत्ता अकरावी व बारावी कला वाणिज्य विज्ञान व्यवसायिक शिक्षण शाखेतील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून अध्यापनाचे कार्य केले तसेच शिक्षक दिनानिमित्त वकृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला त्यामध्ये प्रथम बक्षीस,द्वितीय बक्षीस,तृतीय बक्षीस देऊन विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. तदनंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार व उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे उपस्थित होते.तसेच कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ. उल्हास पाटील व स्वाती देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच या कार्यक्रमासाठी उपस्थिती डॉ.एस.एल.पाटील,प्रा.अनिल मानकर,प्रा. तोफिक शेख,प्रा.पाटील,प्रा.निकम,प्रा.आर.टी.जाधव, प्रा.योगेश काळे,प्रा.दीपक कल्याणकर,प्रा.चव्हाण, प्रा.कानडे,प्रा. लिंबे,सय्यद,बुटोले सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.मानकर सरांनी केले तर आभार डॉ.एस.एल.पाटील यांनी मानले.

# ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये शिक्षक दिन साजरा

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ६ सप्टेंबर - डॉ. राधाकृष्णन यांनी शिक्षकांच्या समाजातील अमुल्य योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याच्या दृष्टीने ५ सप्टेंबर म्हणजेच त्यांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणुन साजरा करण्याची विनंती केली आणि तेव्हापासुन दरवर्षी भारतात ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिन साजरा केला जातो. शिक्षक दिनाचे औचित्य साधुन ५ सप्टेंबर रोजी बिडकीन येथील सेठ मोतीलाल तोतला शैक्षणीक संस्था संचलित ब्लु व्हॅली इंग्लिश स्कुल मध्ये शिक्षक दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. विद्यार्थांनी शिक्षक दिवस हा मोठ्या



उत्साहात साजरा केला. या वेळी शाळेचे संस्थापक सतिश तोतला सर व शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला, शाळेतिल शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. शाळेतिल विद्यार्थ्यांनी शिक्षकांना पुष्पगुच्छ भेट देऊन शिक्षकांप्रती त्यांचा आदर व्यक्त केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शालेय विद्यार्थी समितीने केले. शाळेचे संस्थापक सतिश तोतला सर व शाळेच्या मुख्यध्यापिका सविता तोतला यांनी शिक्षकाचे महत्त्व आणि शिक्षकांची गरज या विषयी मार्गदर्शन करुन शिक्षक दिनाच्या सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. शिक्षक दिनानिमित्त शाळेच्या विद्यार्थीनी शिक्षका प्रती कविता, व भाषने सादर केली. इयत्ता सहावी,सातवी,आठवी च्या विद्यार्थ्यांनी आज शिक्षक दिनानिमित्त शाळेचे संपुर्ण कामकाज पाहिले. आजच्या दिवशी शाळेचे संचालक पार्थ चव्हाण, मुख्यध्यापिका मानसी माळी पाटील, उपमुख्यध्यापक वेदीका धर्मे, पर्यवेक्षक यश सोळुंके या विद्यार्थ्यांनी आजचा पुर्ण कामकाज पाहिले आणि इतर विद्यार्थीनी वेगवेगळया विषय शिक्षकांची भुमिका साकारली. शिक्षकदिन या कार्यक्रमाची रुपरेषा विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने आखली व कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. सर्वात शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.आणि कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगितेने करण्यात आली.

# श्री ज्ञानेश्वरी वाचन उपक्रमाचा भव्य समारोप सोहळा संपन्न

टिळक नगर - श्रीबालाजी मंदिर टिळक नगर संस्थेच्या वतीने आयोजित साधता संवाद श्रीज्ञानेश्वरी वाचन उपक्रमा चा भव्य समारोप कार्यक्रम आज अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

हिंदू धर्मातील पवित्र अशा श्रावण महिन्याच्या सुरुवातीपासून दररोज श्रीज्ञानेश्वरी ग्रंथाच्या ३०० ओव्यांचे वाचन करण्याचा उपक्रम साधता संवाद श्रीज्ञानेश्र्वरी वाचन उपक्रम, सिडको एन-४ यांच्याकडून प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येतो. त्याप्रमाणे या श्रावण महिन्यातही तो राबविण्यात आला. त्याला जवळपास पावने दोनशेच्या वर माऊली भक्तांनी उदंड प्रतिसाद दिला.

सदर श्रीज्ञानेश्वरी वाचन उपक्रमाच्या समारोपाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आस्था फाऊंडेशनचे सर्वेसर्वा डॉ. श्री नरेंद्र वैद्य हे होते. तर प्रमुख वक्ते म्हणून ह.भ.प. सौ. जागृतीताई जहागीरदार



व ह.भ.प. सौ. संगिता ताई पिंपळे या होत्या होती. सुरूवातीला मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व विठ्ठल रखुमाई आणि माऊलींच्या प्रतिमेचे तसेच वाचकांच्या श्रीज्ञानेश्वरी ग्रंथाचे पुजन करण्यात आले. मान्वरांचा परिचय सौ.संगीता मंडलिक, सौ.पल्लवी सरदेशपांडे व सौ.मृणाल देशपांडे यांनी करून दिला. त्यानंतर प्रा.गजानन केचे यांनी प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांच्या ग्रंथ ज्ञानेश्वरी वाचता भक्तिने... ही अभंग रचना गावून वातावरण भक्तिमय केले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष श्री पी.डी.कुलकर्णी, सदस्या कावेरी मगर व श्री शंकर निनावे यांनी केले.

या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन सौ. मंगला चौरे यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्री पींगळे यांनी केले. या कार्यक्रमास श्री व सौ काळे, श्री अक्कलकोटकर, श्री झिंगाडे, श्री व सौ महाजन,श्री व सौ शिरपेवार, श्री व सौ पिलखाने, श्री व प्रयाग, श्री व सौ बुरांडे, सौ उज्वला दिवान, श्री व सौ पींगळे, श्री नागेश पींपळे यांच्यासह शहरातील व मंदिर परिसरातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय नयनमनोहर व मनाला अध्यात्मिक आनंद देणारा हा श्रीज्ञानेश्वरी वाचन उपक्रम सांगता सोहळा संपन्न झाला. आणि पुन्हा पुन्हा हा योग लवकर यावा हीच माऊलींच्या चरणी प्रार्थना करून आनंदाचा गोपाळ काला व प्रसाद घेऊन तृप्त मनाने पण जड अंतः करणाने माऊली भक्तांनी एकमेकांचा निरोप घेतला.

सुरूवातीला या उपक्रमाचे मार्गदर्शक प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी) यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रमुख वक्त्या ह.भ.प.सौ. जागृती ताई जहागीरदार यांनी अतिशय अभ्यासपूर्ण असे माऊलींचे,नाथांचे व इतर संतांचे दाखले देत माऊली भक्तांना मार्गदर्शन करून मंत्रमुग्ध केले. त्यानंतर हे.भ.प.सौ. संगीता ताई पिंपळे यांनीही अतिशय अभ्यासपूर्ण मार्गदर्शन करतांना माऊलींच्या ओव्या गात उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. शेवटी अध्यक्षीय समारोप करताना डॉ. नरेंद्रजी वैद्य यांनी शरीर शास्त्र व अध्यात्म यांची कशी जोड आहे हे अतिशय विनोदी शैलीने सांगितले आणि उपस्थितांना खळखळून हसवले.

---

संरिका नं.२०२४/५.वि.अ.वै. एम.ए.जी./ज.ग. नाँद/सी.आर १२०२४
दिनांक : २४/०४/२०२४.

## जाहीर प्रगटन

अर्जदार :- श्री/श्रीमती सुनिता तानाजी कांबळे रा. रामनगर रांजनगांव शे पु ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

:: विरुध्द ::

गैरअर्जदार - ग्रामपंचायत कार्यालय रांजनगांव शे पु ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विषय :- जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ (सुधारीत २०२३) मध्ये कलम ११(२) व ३ प्रमाणे जन्म मृत्यू नोंद बाबत.

उथाअर्थ अर्जदार यानी या कार्यालयास अर्जदार यांचे मुलगा नामे आशिष तानाजी कांबळे यांचा जन्म दिनांक १०/०६/२००८ रोजी गाँजे रांजनगांव शे पु ता. गंगापूर येथे झाला असून ग्रामपंचायत कार्यालय रांजनगांव शे पु ता. गंगापूर येथील जन्म/मृत्यु रजिष्टरलाजन्म नोंदणी करण्यासाठी आदेश होणेस अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी या जाहीर प्रगटना व्दारे कळविण्यात येते की, सदर नोंद बाबत कोणाचा उजर, अक्षेप हरकत असल्यास त्यांनी हे प्रगटन जाहीर झाल्यापासून ३० दिवसाचे आत आपला उजर, अक्षेप हरकत या न्यायालयात लेखी स्वरुपात नोंदवावा गुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही व अर्जदाराचे मागणीनुसार सदरची नोंद करण्याबावत संबंधितांना आदेश दिला जाईल.

आज दिनांक २४/०४/२०२४ रोजी गाझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

ठिकाण :- वैजापूर.

दिनांक : २४/०१/२०२४.

उप विभागीय अधिकारी, वैजापूर.

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ११९/२०२४.

मीराबाई हरिचंद चौधरी, वय ८६ वर्ष धंदा घरकाम, ता. बनौटी, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर, विठ्ठल हरिचंद चौधरी, वय ७३ वर्ष, धंदा. शेती, रा. बनोटी, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर शंकर हरिचंद चौधरी, वय ५५ वर्ष, धंदा. शेती, रा. बनोटी, सोयगाव, जि. छ. संभाजीनगर,

विरुद्ध

निल

प्रकरण : वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेंसाठी ॲड. सचिन सु. गिरी, सोयगांव, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत हरिचंद गणा चौधरी यांचा दिनांक १२/१०/२०१५ रोजी मौजे बनोटी, ता. सोयगांव, जि. छ संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार क्रं. १तै ३ हे बारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे मयत हरिचंद गणा चौधरी यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या बारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ४/९/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता २३/१०/२०२४

आदेशावरुन,

क. लिपीक — संहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश न्यायालय क. स्तर गंगापुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३७१/२०२४

अर्जदार : १) आलिम महमद हनिफ शेख, २) खातुंबी मोहम्मद उर्फ महमद हनीफ शेख, ३) सुभान महमद हनिफ शेख, ४) सिराज महमद हनिफ शेख, ५) शेख वजीर शेख मोहम्मद हनीफ, ६) नजीर महमद शेख, रा. गवळीधानोरा, ता.गंगापुर जि.छ. संभाजीनगर ७) बुरहान महमद हनीफ शेख, अर्जदार नं. १ ते ५ आणि ७ रा.प्रतापपुर, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर (औरंगाबाद) ८) परवीन बानो जावेद शेख, रा.कसाबखेडा, ता. खुलताबाद जि. छ. संभाजीनगर ९) मुमताजबी सलीमखान पठाण, रा. नारायणपुर बु., ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर १०) शमाबी इसाक पटेल, रा.लोणी, बोडखा, ता. खुलताबाद जि.छ. संभाजीनगर ११) शेख मलेखा शेख युनुस रा.अबरार कॉलनी, बीड बायपास रोड, रेल्वे स्टेशन, ता.जि.छ. संभाजीनगर (औरंगाबाद)

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी महमद हनिफ तारू शेख हे दि.११/०३/२०२३ रोजी मौजे प्रतापपुर, ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मृत्यु पावले असुन वर नमुद अर्जदारांनी मयताचे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी ॲड. श्री.व्ही. जी. खाजेकर, गंगापुर यांचे मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी अर्जदार यांना या न्यायालया तर्फे वारस प्रमाणपत्र देणे कामी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप असल्यास जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून ३० दिवसाचे आत या न्यायालयात लेखी आक्षेप स्वतः अथवा आपल्या विधीज्ञा मार्फत नोंदवावा. मुदतीचे आत आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढील कायदेशीर कार्यवाही नियमाप्रमाणे करून अर्जदारांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

सदरचे जाहीर प्रगटन दि.०६/०९/२०२४ माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

पु.ता. १९/१०/२०२४

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १२३/२०२४.

मनीषा सुभाष पवार, वय ४५ वर्ष धंदा. घरकाम, ता. गोंदेगाव, ता. सोयगाव, जि. छ. संभाजीनगर.

हर्षल सुभाष पवार, वय. २४ वर्ष, धंदा. शिक्षन, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड. सचिन सु. गिरी, सोयगांव, ता सोयगांव, जि. उ संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत सुभाष शालीकाराव पवार यांचा दिनांक ०८/०८/२०२४ रोजी मौजे बनोटी, ता. सोयगांव, जि, छ संभाजीनगर येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरोल अर्जदार क्रं. १ते २ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते २ हे मयत सुभाष शालीकाराव पवार यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक ४/९/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु. ता२५ /१०/२०२४

आदेशावरुन,

क. लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.वि.अर्ज क्र.३६४/२०२४

अर्जदारः-१) राजु गोरखनाथ माघाडे, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) नाथा गोरखनाथ माघाडे, वय ५० वर्षे, धंदा शेती रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) काशीबाई भ्र. माणिक कोळसे वय ६५ वर्षे, धंदा शेती रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ४) उषाबाई भ्र. भास्कर कोळसे वय ५७ वर्षे, धंदा शेती रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) मंदाबाई भ्र ज्ञानेश्वर मुंजाळ वय ३६ वर्षे धंदा शेती रा खडकनारळा ता. गंगापुर जि छत्रपती संभाजीनगर ६) कमलबाई भ्र. विजय माघाडे, वय ४९ वर्षे, धंदा शेती रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ७ ) अमोल विजय माघाडे, वय २८ वर्षे, धंदा शेती रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर कोमल पि. विजय माघाडे, वय २४ वर्षे, धंदा शेती, रा. मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर शुभांगी पि. विजय माघाडे, वय २२ वर्षे, धंदा शेती रा. मांजरी ता. जि. छत्रपती संभाजीनगर गंगापुर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण - हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. ए.बी. कुलकर्णी यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ व २ हे आपसांत नात्याने सख्खे भाऊ असुन अर्जदार क्र. ३ ते ५ ह्या त्यांच्या बहिणी आहेत. तसेच अर्जदार क्र. ६ ही अर्जदार क्र.१ ते ५ यांचा मयत भाऊ नामे विजय गोरखनाथ माघाडे यांची पत्नी, अर्जदार क्र.७ हा मुलगा व अर्जदार क्र. ८ व ९ ह्या मयत विजय गोरखनाथ माघाडे यांच्या मुली आहेत. अर्जदार क्र.१ ते ५ यांचे पिता, अर्जदार क्र.६ चे सासरे व अर्जदार क्र. ७ ते ९ यांचे आजोबा (वडीलांचे वडील) नामे गोरखनाथ रघुनाथ नाघाडे हे मौजे मांजरी ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक ०८/०४/२०२३ रोजी मौजे मांजरी ता. गंगापुर येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्र.१ ते ५ यांची आई, अर्जदार क्र.६ ची सासु व अर्जदार क्र. ७ ते ९ यांचे आजी (वडीलांची आई) नामे केसरबाई गोरखनाथ माघाडे ह्या दिनांक ०५/०५/२०२४ रोजी मौजे मांजरी ता. गंगापुर येथे गयत झालेल्या आहे. मयत गोरखनाथ रघुनाथ माघाडे व मयत केसरबाई गोरखनाथ माघाडे यांना तीन मुले व तीन मुली म्हणजेच अर्जदार क्र.१ व २ हे मुले व अर्जदार क्र.३ ते ५ ह्या मुली व एक मुलगा विजय गोरखनाथ माघाडे असे वारस असून त्यापैकी विजय गोरखनाथ माघाडे हा मुलगा दिनांक ०३/०४/२००२ रोजी मयत झालेला असुन मयत विजय यांना अर्जदार क्र.६ ही विधवा पत्नी, अर्जदार क्र.७ हा मुलगा व अर्जदार क्र.८ व ९ ह्या मुली असे वारसदार आहेत. येणे प्रमाणे मयत गोरखनाथ रघुनाथ माघाडे यांना अर्जदार क्र.१ ते ९ असे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार वारसदार नाहीत. मयत गोरखनाथ रघुनाथ माघाडे यांचे नावे मौजे मांजरी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेत जमीन गट क्र. ६१ मध्ये एकुण क्षेत्रफळापैकी ०,०७,०० आर. शेत जमिन आहे. सदर जमिन नावावर करणे कामी अर्जदारांनी या न्यायालयात वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक ७/१/२०२४ रं /२०२४ रोजी दिले.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी न्यायालय गंगापूर

---

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर) न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद.**

सिव्हील एम ए.क. ३७५ /२०२४ प्रकरणात पुढील तरीख दि. ८/१०/२०२४

अर्जदार : १) शशिकला क्ष. बापु बरडे, वय ६० वर्ष, धंदा घरकाम, २) दत्तु पि. बापु बरडे, वय ५० वर्ष, धंदा मजुरी, ३) संतोष पि. बापुराव बरडे, वय ४४ वर्ष, धंदा मजुरी, ४) रामनाथ पि. बापुराव बरडे, वय ४१ वर्ष, धंदा मजुरी, ५) ताराबाई भ्र. भानुदास बरडे, वय ४१ वर्ष, धंदा घरकाम, ६) कावेरी पि. भानुदास बरडे, वय १९ वर्ष, धंदा घरकाम, ७) सरीता पि. भानुदास बरडे, वय १७ वर्ष, अ.पा.क. आई अर्जदार क ५ ताराबाई भ्र. भानुदास बरडे, वय ४१ वर्ष, धंदा घरकाम, ८) पवन पि. भानुदास बरडे, वय १६ वर्ष, अ.पा.क. आई अर्जदार क ५ ताराबाई भ्र. भानुदास बरडे, वय ४१ वर्ष, धंदा घरकाम, सर्व रा. येसगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद.

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे बाबत

सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी या न्यायालयात ॲड. एम. पी. दारूंटे गंगापुर यांच्यामार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणे कामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वर नमुद ठिकाणचे राहणारे असुन अर्जदार क १ हि अर्जदार क २ ते ४ यांची आई असुन अर्जदार क २ ते ४ हे आपसात नात्याने सख्खे भाउ आहे. अर्जदार क ५ हि अर्जदार क १ चा मुलगा व अर्जदार क २ ते ४ यांचा मयत भाउ नामे भानुदास बापुराव बरडे याची पत्नी असुन अर्जदार क ६ ते ८ हे मयत भानुदास बापुराव बरडे यांची मुली व मुलगा आहे. अर्जदार क १ चे पति व अर्जदार क २ ते ४ यांचे वडील व अर्जदार क ५ चे सासरे आणि अर्जदार क ६ ते ८ यांचे आजोबा नामे बापु मारोती बरडे हे दि. ३१/०१/२०२२ रोजी मौजे येसगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयत बापु मारोती बरडे व अर्जदार क १ चा मुलगा, अर्जदार क २ २ ते ४ यांचा भाउ व अर्जदार क ५ चे पति व अर्जदार क ६ ते ८ यांचे वडील नामे भानुदास बापुराव बरडे हे दि. २६/०९/२०१३ रोजी मौजे येसगांव ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले आहे. मयत बापु मारोती बरडे व मयत भानुदास बापुराव बरडे यांना अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत मयत बापु मारोती बरडे यांना अर्जदार क १ ते ८ हेच एकमेव कायदेशीर वारसदार आहे. अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही वारसदार नाही. मयत बापु मारोती बरडे यांच्या मृत्यु मुळे अर्जदारांना शासकीय, निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला असुन वारस प्रमाणपत्राची मागणी केली आहे सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. करीता

जाहीर प्रगटन. आज दि. ०५/०९/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

# लाडकी बहीण योजना हे शिंदे सरकारच सर्वात मोठ यश -अर्जुनराव खोतकर



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन येथे तालुका शिवसेनेच्या वतीने कार्यकर्ता मेळावा तसेच मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेच्या मानकरी असलेल्या माता-भगिनींचा ता.६ शुक्रवार रोजी येथील रत्नमाला लॉन्स मध्ये भव्य सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.यावेळी हजारोंच्या संख्येने महिला व कार्यकर्ते उपस्थित होते.

याप्रसंगी शिवसेनेचे उपनेते अर्जुन भाऊ खोतकर म्हणाले की आपल हे जे शिंदे सरकार आहे महिलांसाठी अतिशय झटून काम करत असून या सरकारने महिलांसाठी अतिशय अभिनव व कल्याणकारी योजना राबवत आहे.यामधे लाडकी लेक असेल,बसमधे अर्धे भाडे असेल,लाडकी बहीण योजना अश्या भरपूर योजना राबविण्यात येत आहेत. पुढे बोलतांना ते अस ही म्हणाले की मी खंबीरपणे शिवसैनिकाच्या पाठिशी उभा असून जर कोणी माझ्या शिवसैनिकांना त्रास देण्याचा प्रयत्न केला तर याद राखा असा सज्जड दम ही विरोधकांना दिला. यावेळी सर्व माता-भगीनींच्या वतीने प्रतिभाताई गाढे यांनी अर्जून खोतकर यांना राखी बांधून औक्षण केले. यावेळी युवा सेना सचिव व सिल्लोडचे उपन-गराध्यक्ष समीर भैय्या अब्दूल सत्तार यांनी सुध्दा सरकारच्या लोकोपयोगी योजनांची महिला व कार्यकर्त्यांना अतिशय सोप्या भाषेत माहिती दिली. यावेळी युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर,जिल्हा संपर्कप्रमुख पंडीत भुतेकर,जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे,ड भास्कर मगरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले याप्रसंगी नंदकिशोर सहारे,मनोज झंवर,सुदर्शन अग्रवाल,युवा तालुकाप्रमुख गणेश पुंगळे,जाफ्राबाद तालुकाप्रमुख दत्ता बंगाळे,बालाजी पवार,जाकेर सय्यद,फारूख शेख,तेहजीब शेख,बाबासाहेब पगारे,बबलू तेलंग्रे,अमोल श्रीवास्तव,डब्बू शेख,ईश्वर जुजबी तसेच असंख्य कार्यकर्ते व महिला हजर होत्या. यावेळी सूत्रसंचालन तालुकाप्रमुख नानासाहेब वानखेडे यांनी केले तर प्रास्ताविक जिल्हा उपप्रमुख भुषण शर्मा व आभार तालुकाप्रमुख विशाल गाढे यांनी मानले.

# गोंदी पोलीस स्टेशन यांच्या वतीने शांतता बैठक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड ६ सप्टेंबर शहागड आगामी काळात होत असलेल्या गणेशोत्सव व ईद या सणाच्या निमित्ताने पोलीस स्टेशन गोंदी अंतर्गत असलेल्या शहागड दूरक्षेत्र येथे आज रोजी माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी अंबड मा. श्री विशाल खांबे, सपोनी आशिष खांडेकर सहाय्यक पोलीस निरीक्षक, तसेच हद्दीतील विविध गणेश मंडळाचे अध्यक्ष , सचिव, सरपंच, ग्रामसेवक, प्रतिष्ठित नागरिक,पोलीस पाटील, डीजे मालक यांची गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद अनुषंगाने पोलीस चौकी शहागड या ठिकाणी शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीच्या अनुषंगाने आगामी काळात होणारे सण व उत्सव याबाबत योग्य मार्गदर्शन करून सदर सण हे शांततेत पार पाडण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

# परतूर मंठा मतदारसंघ शिवसेनेला सोडण्यात यावा शिवसेना पदाधिकाऱ्यांची एक मुखी मागणी

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**





परतूर मंठा नेर सेवली मतदारसंघ हा शिव-सेनेला सोडण्यात येऊन शिवसेना जिल्हाप्रमुख मोहन अग्रवाल यांना उमेदवारी जाहीर करावी अशी मागणी परतुर /मंठा नेर सेवली भागातील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी शिवसेना नेते व विभागीय नेते अर्जुनराव खोतकर यांची जालना येथे भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की भारतीय जनता पार्टीच्या उमेदवाराने हा मतदारसंघ सात ते आठ वेळेस निवडणूक लढविलेले आहे आणि सध्याची परिस्थिती पाहता भारतीय जनता पार्टी पेक्षा शिवसे-नेला पोषक वातावरण आहे तसेच भाजप-ला सात ते आठ वेळेस उमेदवारी दिली असता यावेळेस शिवसेनेला देणे यात गैर काय आहे? मोहन अग्रवाल हे उच्चशिक्षित असून त्यांना सर्व भाषेचे ज्ञान आहे सर्व सर्व जाती धर्माचे लोक त्यांच्या सोबत आहेत मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे यांच्या माध्यमातून मतदार संघामध्ये त्यांनी शेकडो कोटी रुपयांचे विकास कामे केलेले आहेत तसेच शिवसेनेच्या संघटनमक बांधणी प्रत्येक गावात बूथ प्रमुख, शिवदूत,योजना दूत,शिवसेना सभासद नोंदणी,पदाधिकारी, कार्यकर्ते, शाखाप्रमुख,शिवसेना शाखा कार्यकारणी, आशा पद्धतीने शिवसेनेची मतदार संघामध्ये बांधणी करण्यात आलेले आहे, आणि लोकांचा शिवसेनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक असून शिवसेनेमध्ये दररोज मतदार संघातील प्रवेश सोहळे सुरूच असतात, आणि भारतीय जनता पार्टी पेक्षा शिवसेनेला हा मतदारसंघ निवडून येणे अत्यंत सोपे आहे आगामी काळात महाराष्ट्र राज्यात शिवसेना-भाजप युतीची सत्ता आणयाची असल्यास हा मतदारसंघ शिवसेनेला सोडणे अत्यंत गरजेचे आहे म्हणून ह्या सर्व भावनांचा विचार करून मुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे व भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांना आमच्या भावना कळवण्यात याव्यात अशी विनंती अर्जुनराव खोतकर यांना निवेदनाद्वारे केलेली आहे. लवकरच परतूर मंठा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकारी यांचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांना व भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांना मुंबई येथे भेटणार आहे त्यांच्याकडे या मतदारसंघाची वस्तूस्थिती मांडणार आहेत अशी ही माहिती मिळालेली आहे. यावेळी शिवसे-नेचे जालना जिल्हा संपर्कप्रमुख पंडित दादा भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना दलित आघाडी जिल्हाध्यक्ष भास्करराव मगरे परतुर मंठा मतदार संघ

शिस्टमंडळामध्ये मंठा मार्केट कमिटीचे माजी सभापती प्रल्हादराव बोराडे शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबासाहेब चिखले परतुर शिवसेना तालुकाप्रमुख अमोल सुरूग मंठा तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे शिवाजी तरवटे जिल्हाध्यक्ष ओबीसी सेल, विजयकुमार गिरी विधानसभा संघटक, सो ललिता ताई काळदाते महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख, योगेश गंगे उपजिल्हाप्रमुख युवासेना, दीपक हिवाळे शहर प्रमुख परतुर, शेख खाजा अल्पसंख्यांक आघाडी परतुर, राहुल भदर्गे दलित आघाडी तालुकाप्रमुख, नीताताई घोंग महिला आघाडी तालुकाप्रमुख, अविनाश कापसे युवा सेना तालुकाप्रमुख, रंजीत कोल्हे तालुकाप्रमुख परतुर, रामप्रसाद कसा ज्येष्ठ नेते, सोपान का तारे तालुकाप्रमुख, नितीन राठोड तालुकाप्रमुख, अंगत खरात विभाग प्रमुख, मधुकर निलेवाड कैलास ढवळे विभाग प्रमुख, सोनाली देशमुख महिला आघाडी तालुकाप्रमुख, संगीता ताई मगर महिला आघाडी तालुकाप्रमुख परतुर, सोनाली राऊत महिला आघाडी शहर प्रमुख परतुर, रामराव वरकड तालुकाप्रमुख मंठा, विलास राठोड उप तालुकाप्रमुख, दीपक गायकवाड युवा सेना तालुकाप्रमुख मंठा, पांडुरंग बोराडे अमोल वीरकर शिवसेना शहर प्रमुख कैलाश पुरी उपशहर प्रमुख मधुकर निलेवाड, राजाराम भांडवलकर, दत्ता आढाव ग्रामपंचायत सदस्य, उपशहर प्रमुख विनोद खरात सर्कल प्रमुख पाटोदा सुनील गुंड सर्कल प्रमुख तळणी नंदू मामा जाधव सर्कल प्रमुख, अभिषेक रोकडे उपविभाग प्रमुख, चांद भाई अल्पसंख्यांक आघाडी तालुका प्रमुख म्हणतात, कैलास चव्हाण वैद्यकीय कक्ष प्रमुख, सरपंच लक्ष्मण कदम, देविदास शेजुळ संजीव राठोड राम सुरेश दगडू चव्हाण रामा मानू राठोड राजेभाऊ चव्हाण महादेव चव्हाण दगडोबा चव्हाण, विलास भानुदास राठोड, राठोड,, शिवाजी राठोड, औदुंबर गोरे ग्रामपंचायत सदस्य वरफळ, संदिपान रुपनर, साहेबा जरा, बाळासाहेब गोरे, प्रणय मोर शहर प्रमुख, अतुल आर्दड, अशोक टेकाळे, अलीम भाई अल्पसंख्यांक शहर प्रमुख मंठा नागेश चिखले विभाग प्रमुख वाटुर अंगात खरात विभाग प्रमुख वाटुर माऊली वायाळ सर्कल प्रमुख खराडसावंगी, रंजीत कोल्हे, नजीर भाई, शरद तळेकर प्रल्हाद शेळके कविताताई ताठे श्री कदम शाम तळेकर आदिनाथ घुगे व आदी कार्यकर्ते उप-स्थित होते

# संक्षिप्त

## हिंडिंबा माता की जय' जय श्रीराम, जय बजरंगबली, च्या गजरात पारध नगरी दुमदुमली



**तभा वृत्तसेवा**
**पारध/प्रतिनिधी**

हिडिंबा माता की जय', 'पराशर महाराज की जय' या जयघोषात संपूर्ण पारध नगरी यात्रेनिमित्त शनिवारी दुमदुमून गेली. येथे शनिव-ारपासून भोकरदन तालुक्यातील पारध बु. येथील हिडिंबा यात्रेला मोठ्या उत्साहात सुरूवात झाली.

दुपारी एक वाजता हिडिंबेच्या प्रतिमेची मिरवणूक मोठ्या थाटामाटात बैलगाडीतून संपूर्ण गाव-ातून मिरवण्यात आली. दरम्यान, मिरवणुकीत स्थानिक महिला भजनी मंडळ पुरुष भजनी मंडळासह परिसरातून आलेल्या भजनी व भारूड मंडळांनी आपापल्या कला सादर करून यात्रेकरूंचे मनोरंजन केले. यामध्ये माऊली भजनी मंडळ, दुर्गामाता महिला भजनी मंडळांनी विविध प्रकारचे भजन, भारूड सादर केले. तरुणांनी या मिरवणुकी दरम्यान मुगदल, ह्या वर्षी पहिल्यांदच महाबळी हनुमान यांचा देखावा दाखवण्यात आला हे आयोजन आसरा माता मित्र मंडळ यांनी आयोजीत केले होते.. जय श्रीराम, बजरंग बली की जय असे घोष देण्यात आले. लाठ्या-काठ्या फिरविणे आदी खेळ खेळून भाविकांचे लक्ष वेधून घेतले. येथील जयस्तंभ चौकातून या मिरवणुकीला सुरूवात झाली. मिरवणूक मार्गावर महिलांनी आपल्या घरासमोर आकर्षक रांगोळ्यांनी अंगण सुशोभित केले होते. हिडिंबा व महर्षी पराशर ऋषींचे दर्शन घेण्यासाठी लग्न होऊन सासरी गेलेल्या मुली, नोकरी व्यवसायासाठी बाहेरगावी गेलेले चाकरमाने यांच्यासह मराठवाडा, विदर्भ, खान्देश, वऱ्हाडातील हजारो भाविक पारध येथे डेरेदाखल झाले होते. ही मिरवणूक भर पावसात तब्बल पाच तास उत्साहात सुरू होती. मिरवणुकी दरम्यान सर्वात पुढे महर्षी पराशर ऋषींची पालखी त्यानंतर महाबळी हनुमान यांचा देखावा,वगदा-वगदी आणि सर्वात शेवटी हिडींबाची अक्राळ-विक्राळ तयार केलेली बैलगाडीत उभारलेली प्रतिमा. मिरवणुकी दरम्यान गावात अतिशय भक्तीमय वातावरणात तयार झाले होते. शेवटी महर्षी पराशर ऋषी मंदिर परिसरात रायघोळ नदीच्या तीरावर मोठ्या भक्तीमय वातावरणात या मिरवणुकीचे विसर्जन झाले. महाबळी हनुमान यांचा देखवाची सजावट ही दीपक देशमुख, तेजस देशमुख सागर देशमुख व आसरा माता मित्र मंडलाचे सर्व सदस्य यानी परिश्रम घेतले व हिडींबा मिरवणूक ची सजावटीसाठी देविदास तेलंग्रे, रामदास राऊत, मोहन बेराड, संपत काटोले यांच्यासह बारी समाज बांधवांनी परिश्रम घेतले, तर वगदा वगदी मिरवणूक व सजावटीसाठी पांडुरंग बोराडे, श्रीराम डोईफोडे, साळुबा अल्हाट यांच्यासह माळी समाज बांधवांनी परिश्रम घेतले. संपूर्ण यात्रा उत्सव शांततेत पार पडावी पारध पोलीस ठाण्याचे सपोनि माने यांनी कडक बंदोबस्त ठेवला.

## सत्कर्माचा पाहिलं मार्ग आई-वडिलांच्या सेवेतून - हभप पंकज महाराज थोरे



**तभा वृत्तसेवा**
**परतूर/प्रतिनिधी**

मनुष्य जीवनात सत्कर्म करण्यासाठी कुठे बाहेर जायची गरज नाही ,तर घरातील आईवडिलांची सेवा करा तेथूनच सतकर्माचा मार्ग सुरू होतो, असे विचार देवणांद्रा ता पाथरी येथील प्रसिध्द तरुण कीर्तनकार भागवतचार्य हभप पंकज महाराज थोरे यांनी राणी वाहेगाव ता.परतूर येथील किर्तनसेवेत मांडले. राणी वाहेगाव पुनर्वसन येथे दीं .५ सप्टेंबर रोजी स्व.रामप्रसाद राऊत यांच्या वर्ष श्राद्ध निमित्त झालेल्या किर्तनात हभप पंकज महाराज थोरे विचार मांडत होते .आई वडिलांची सेवा करा देव कुठेही पहायची जायची गरज नसल्याचे त्यांनी सांगितले.सत्कर्म करण्याचा पहिला मार्ग आपल्या घरातून सुरू होतो.आई वडील सेवा केली नाही तर यमाचा पाहुणा व्हावे लागेल यात अनंत यातना भोगाव्या लागतील असे पंकज महाराज थोरे यांनी सांगितले. मृत्यू होत नाही तो पर्यंत परिवार नंतर काही नाही त्यासाठी सत्कर्म करून चिरकाल तुमचे अस्तित्व टिकून ठेवा. जन्म घेतला मृत्यू अटळ आहे तो कधी कोणत्या रूपात येईल सांगता येणार नाही.अवतार घेतलेल्या भगवांतलाही मृत्यू लोकातील अवतार सोडून जावे लागले हे लक्षात घ्या व आपल्या हातून जे जे सत्कार्य होईल ते करत रहा असे ते म्हणाले.या कीर्तन सोहळ्याला हभप गणेश महाराज जाधव परतूरकर यांचीही उपस्थिती होती.

# गणेश मंडळाजवळ जुगार खेळणारांवर कारवाई

## शांतता कमिटीच्या बैठकीत उप.वि.पोलीस अधिकारी दादाहरी चौरे यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/ प्रतिनिधी**



गणेशोत्सव शांततेत साजरा करावा कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची प्रत्येकाने काळजी घ्यावी गणेश मंडळाजवळ जुगार खेळणारांवर कारवाईचा इशारा परतुरचे उपविभागीय पोलीस अधिकारी दादाहरी चौरे यांनी दिला. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मंठा पोलीस स्टेशन येथे गुरुवार ता.५ रोजी आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत श्री चौरे बोलत होते. यावेळी पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे, नायब तहसीलदार संजय शिंदे, सपोनी कैलास भारती, उपनिरीक्षक संतोष माळगे, नगरपंचायतचे अन्सारी, सुधाकर खैरे, विद्युत वितरणचे विविध राजकीय पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, पोलीस पाटील, गणेश मंडळाचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना श्री चौरे म्हणाले की, मी पदभार स्वीकारल्यानंतर मंठा शहराची माहिती घेतली असता या ठिकाणी सर्व सण एकोप्याने साजरे केले जात असल्याची माहिती मिळाली. एकंदरीत शहरातील सर्व नागरिकांनी शांतता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक रवींद्र निकाळजे म्हणाले की, नागरिकांनी केलेल्या सूचनेनुसार नगरपंचायतने छत्रपती शिवाजी महाराज चौकात सीसीटीव्ही कॅमेरे लावावे त तसेच मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजवून रस्ता करावा, मिरवणुकीतील वाहन चालक नियमांचे पालन करणारा असावा, श्री गणपती मूर्ती स्थापनेसाठी उभारलेल्या मंडपाला सर्व बाजूंनी ताडपत्री लावावी जेणेकरून पावसामुळे नुकसान होणार नाही याची सर्वांनी काळजी घ्यावी असे सांगून विद्युत वितरण कंपनीला सुद्धा वीजपुरवठा खंडित होणार नाही अशा सूचना दिल्या. या बैठकीत नायब तहसीलदार संजय शिंदे, नगरपंचायत चे अन्सारी, विद्युत वितरण चे.......सिराजखान पठाण, पत्रकार संघाचे अध्यक्ष नागेश कुलकर्णी रणजीत बोराडे पो-लीस पाटील संघटनेचे श्री डोईफोडे, पत्रकार संतोष दायमा, अलीभाई कुरेशी यांनी आपले विचार मांडले. या बैठकीचे सूत्रसंचालन बाजार समितीचे संचालक मुस्तफा पठाण यांनी केले.

# वडगांव तांडा येथील युवकांचा राष्ट्रवादीत प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील वडगाव येथील भाऊनाईक तांडयामधील असंख्य कार्यकर्त्यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला. यावेळी जालना रायुकाँचे तालुकाध्यक्ष उमेश मोहिते, किशोर सवडे ,संदीप राठोड किसन पवार बिसन पवार यांची उपस्थिती होती. याप्रसंगी रवी पवार, प्रदीप पवार,विनायक राठोड, गोरख राठोड, धनराज पवार, अजय जाधव,आंबादास पवार, अरविंद चव्हाण, अमोल जाधव, सचिन पवार, राहुल राठोड , बाबा जाधव ,रितेश पवार, भरत पवार , मोहन राठोड, प्रदीप जाधव, प्रदीप पवार ,समाधान पवार, मोहन पवार ,विशाल राठोड, रोहित जाधव, धनराज पवार, रामू पवार, सुनील राठोड, यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला.

# परीक्षा संपताच विद्यापीठास अहवाल पाठवणे अनिवार्य! -डॉ.भारती गवळी

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार बी. ए .बी.कॉम.बी.एस.सी.विद्या शाखांतील प्रथम वर्षाच्या पहिल्या सत्राच्या परीक्षा महाविद्यालयांनाच घ्यावयाच्या असून होम सेंटर असल्याने परीक्षा उद्या , परवा घेऊ असे काहीही चा-लणार नाही, नियम, शिस्त पाळून परीक्षा संपताच उपस्थिती अहवाल, विद्यापीठास पाठवणे अनिवार्य आहे.तसेच विद्यार्थ्यांचा ए.बी.सी.आय.डी.तयार करावा लागेल.अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यांकन मंडळाच्या संचालिका डॉ.भारती गवळी यांनी आज दिली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर -नोव्हेंबर २०२४ सत्रातील सर्व पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम परीक्षेच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी ( ता. ०६) व्ही. एस. एस. महाविद्यालयात विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ.भारत खंदारे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय बैठक संपन्न झाली. प्राचार्य डॉ.प्रसाद मदन,प्राचार्या डॉ. कविता प्राशर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. डॉ. भारती गवळी यांनी परीक्षांच्या आयोजन , नियोजनाबाबत माहिती देतांना, राज्यपाल कार्यालयाकडून सर्व परीक्षांचे नियंत्रण केले जाते, नवीन परीक्षांचा मसुदा हा प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांकरिता असून द्वितीय , तृतीय वर्षाकरिता लागू नाही. व्यावसायिक आणि कौशल्य अभ्यासक्रमांना लेखी ऐवजी प्रात्यक्षिक परीक्षांवर भर द्यावा याबाबत विद्यापीठात झालेल्या बैठका, चर्चांविषयी माहिती दिली. डॉ.गवळी पुढे म्हणाल्या, आता तीन ऐवजी दोन तासांची परीक्षा असेल महाविद्यालयातच पेपर तपासणी करावी, आठ दिवसांत प्राचार्य ,प्राध्यापक, कस्टडीयन यांच्या नियंत्रणाखाली विद्यापीठास गुणपत्रक सादर करावे लागेल, १७ व्या दिवशी निकाल जाहीर केला जाईल. असे सांगून विद्यार्थ्यांना पुनर्मूल्यांकनासाठी अर्ज करता येईल. अशी सविस्तर माहिती डॉ.भारती गवळी यांनी दिली. अध्यक्षीय समारोपात डॉ.भारत खंदारे यांनी केवळ असेसमेंट साठी ठेवले असून महाविद्यालयांनी अकॅडमीक बँक ऑफ क्रेडिट ची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी असे सांगितले. सूत्रसंचालन डॉ. काझी कबीर यांनी केले तर डॉ.रोहित पिपरीये यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ.अनंत चौधरी,डॉ.निळकंठ वडजे, डॉ. बिरादार, डॉ. प्रशांत कुमार वनंजे, डॉ.मिलिंद पंडित,संगीता गायकवाड, जिजाबाई जाधव,राजेंद्र जैस्वाल, तनपुरे,खोमणे, यांच्यासह जिल्ह्यातील ९२ महाविद्यालयांचे संचालक, प्राचार्य ,प्राध्यापकांनी बैठकीत सहभाग नोंदवला.

# दोन भामट्यांनी एटीएम कार्ड बदलून वृद्धाच्या खात्यातून ४० हजार केले लंपास

## भोकरदन येथील प्रकार दोन जण पोलिसांच्या ताब्यात




**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील एसबीआय बँकेत एका पेन्शनधारक वृद्धांच्या एटीएम कार्ड बदलून दोन भामट्यांनी त्यांच्या बँक खात्यातील ४० हजार रुपये लंपास केले. ही घटना ३१ ऑगस्ट रोजी घडली असून, या प्रकरणात मंगळवारी भोकरदन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भोकरदन शहरातील महेश तानसिंग राजपूत यांचे आजोबा पद्मसिंग धनसिंग राजपूत यांचे एसबीआय बँकेत पेन्शन खाते आहे. पद्मसिंग राजपूत हे ३१ ऑगस्ट रोजी दुपारी एटीएमद्वारे पैसे काढण्यासाठी गेले होते. त्यावेळी त्यांना येणारी अडचण पाहता अनोळखी दोघांनी पैसे काढून देण्यासाठी एटीएम कार्ड घेतले. परंतु, त्यांनाही पैसे मिळाले नाहीत. त्या मुलांनी दिलेले एटीएम कार्ड घेऊन ते घरी गेले. त्यानंतर महेश राजपूत है आजोबांना घेऊन बँकेत गेले. त्यावेळी मॅनेजरने खाते चेक केले असता एका एटीएम मशीनमधून ४० हजार रुपये काढल्याचे समोर आले. वयोवृद्धाच्या आजोबांची फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महेश राजपूत यांनी मंगळवारी भोकरदन पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती . दरम्यान पोलीस अधिक्षक सो अजयकुमार बन्सल यांचे परवानगीने पोउपनि राजपुत यांच्या नेतृत्वात एक पथक तात्काळ आरोपी यांना ताब्यात घेण्यासाठी रवाना केले असता पोउपनि राजपुत व त्यांचे टिमने आरोपी नामे अरशद खान व तौफिक यांना पोलीस ठाणे सागबारा जिल्हा नर्मदा राज्य गुजरात येथुन ताब्यात घेवुन पोलीस ठाणे भोकरदन येथे हजर केले. दोन्ही ही आरोपी यांच्या ताब्यातुन एक मोटारसायकल, ४४ एटीएम कार्ड, १४०००/- रुपये रोख रक्कम व दोन मोबाईल असे मिळुण आले आहे. सदरची कामगिरी मा. पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बन्सल, मा. अप्पर पोलीस अधिक्षक श्री. आयुष नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. डॉ. गणपत दराडे, पो-लीस निरीक्षक किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरची कामगिरी पोलीस उपनिरीक्षक पवन राजपुत, पोकों किशोर मोरे, पोकों गणेश गुसींगे यांनी केली आहे.

# जिल्हा शांतता समितीची बैठक संपन्न; आगामी सण, उत्सव सलोख्याने व शांततेत साजरे करावेत -जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**



जिल्ह्यात आगामी काळात विविध श्री गणेश उत्सव व ईद ए मिलाद या सारखे सण, उत्सव साजरे होणार आहेत. तरी जिल्ह्यातील नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आगामी सण, उत्सव सलोख्याने व शांततेत साजरे करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात जिल्हा शांतता समितीची बैठक दि.६ सप्टेंबर २०२४ रोजी सायंकाळी ४ वाजता पार पडली. यावेळी अपर पोलिस अधिक्षक आयुष नोपाणी, अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, पोलिस उपअधिक्षक अनंत कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती. जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ म्हणाले की, जालना जिल्ह्याला शांततेत सण, उत्सव साजरे होण्याची पार्श्वभूमी आहे. ती कायम राखत सण, उत्सवात ते अतिशय आनंदाने साजरे करावेत. जालना जिल्ह्यातील सर्व धर्मीय नागरिक अतिशय सलोख्याने राहत असतात. जिल्ह्यातील नागरिकांनी मागील काळात वेळोवेळी शांततेच्या मार्गाने आंदोलने, मोर्चे काढून प्रशासनाला निवेदन देत एक आदर्श समोर ठेवला आहे. श्री गणेश मिरवणूकीच्या मार्गावरील चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. लग्न समारंभात फोटोग्राफी व व्हीडीओग्राफी करण्यासाठी ड्रोन कॅमेऱ्याचा वापर वाढला आहे. तसेच अज्ञात ड्रोनबाबत तपास सुरु आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरुन जावू नये. ड्रोनमुळे कोणताही धोका उदभवणार नाही. जिल्ह्यात विविध जाती, पंथातील नागरिक दोन बंधूप्रमाणे वर्तन करतात. त्यामुळे यापुढेही सामजस्यांचे, धार्मिक सलोख्याचे वातावरण आगामी उत्सवात देखील राखला जाण्यासाठी प्रशासनाकडून समन्वय राखला जाईल. आगामी सण, उत्सवात विविध सामाजिक उपक्रम राबविले जावून उत्सवांना सामाजिक उपक्रमांची सांगड घालावी, असेही त्यांनी सांगितले. अपर पोलिस अधिक्षक श्री.नोपाणी म्हणाले की, आगामी श्री गणेश उत्सवात मंडळाने सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत. तसेच चोवीस तास गणेश मंडळाचा एक स्वयंसेवक परिसरात नेमावा. श्री गणेश विर्सजनाच्या दिवशी व सर्व कालावधीत मा.सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेली वाद्य तसेच आवाजाची व वेळेची मर्यादा पाळावी. सोशल मीडियावरील अफवांवर विश्वास ठेवू नका तसेच कोणतीही संदिग्ध पोस्ट शेअर, लाईक करु नये. श्री गणेश मिरवणूकीवर पोलिस विभागाकडून ड्रोन कॅमेऱ्याद्वारे नजर ठेवली जाणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. या बैठकीस शांतता समिती सदस्य, विविध श्री गणेश मंडळाचे पदाधिकारी, मुस्लीम समाज बांधव, महिला व युवक, संबंधित विभागाचे कार्यालयप्रमुख आदि मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संपादकीय

तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# पवारांनी टोचले कान...

'दुधाने तोंड पोळले की ताकसुद्धा फुंकून प्यावे,' अशी एक अनुभवसिद्ध मराठी म्हण आहे. राजकारणात याचा अनुभव अनेकांना येत असल्याने अलिकडच्या राजकीय नेत्यांमध्ये ताक फुंकून पिण्याची कायमची प्रथाच पडली आहे. अन्य कोणाचे तोंड दुधाने पोळले तरी इतरांकरिता तो अनुभव पुरेसा असतो. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राजकारणात असे अनेक अनुभव घेतलेले असल्याने, ते तर नेहमीच ताकदेखील फुंकून पितात. दुधाने तोंड पोळलेले अनेक राजकीय नेते त्यांनी पाहिलेले असल्याने किंवा दुधाने तोंड पोळल्याचा अनुभव त्यांनी स्वतःच अनेकांना दिलेला असल्याने, स्वतः ताक फुंकून प्यावे, ही खबरदारी ते नेहमी घेत असावेत. याच अनुभवातून त्यांनी विरोधकांच्या राजकारणातील आपले स्थान भक्कम केले आहे. केंद्रात तर नाहीच; पण महाराष्ट्रातही आपला पक्ष स्वबळावर सत्ता स्थापन करू शकत नाही, याची जाणीव असतानाही काँग्रेसच्या वळचणीला आलेल्या प्रत्येक पक्षाच्या कसोटीच्या वेळी संकटमोचक म्हणून त्यांनाच साकडे घातले जाते आणि आपल्या धूर्त राजकारणातून ते अशा कसोटीच्या प्रसंगातून संबंधितांना वाचविण्याचे कसबही दाखवतात. अशा पवारांनाच आपल्या राजकारणात गुंतविण्याचा उद्धव ठाकरे यांचा उलटा डाव अखेर त्यांच्याच अंगाशी आला आहे. महाराष्ट्रात येऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडी सत्तेवर येईल, अशी स्वप्ने उद्धव ठाकरे यांना पडू लागली आहेत. २०१९ मध्ये संख्याबळाचे गणित उलटे फिरवून महाविकास आघाडीची मोट बांधत सत्ता हिसकावून घेण्याचा धूर्त डाव पवार यांनी जिंकला आणि ठाकरे यांच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ आग्रहाने घालून तत्कालीन अन्य इच्छुकांना कात्रजचा घाट दाखविला होता. त्यामुळे आता पवार यांच्या पसंतिक्रमात आपले नाव पहिल्या क्रमांकावर राहील, असे त्यांना वाटले असावे. पण पवारांच्या मनात नेमके काय आहे, ते अजित पवार यांच्या मुखातून व्यक्त होणाऱ्या वेदनांतून राज्याने ओळखले तरी ठाकरे यांना समजलेच नसावे. त्यांचे प्रवक्ते संजय राऊत यांनी मोठ्या प्रयत्नाने उद्धव ठाकरे यांच्या अंगावर चढविलेली झूल पाहून शरद पवारांना आनंद होईल आणि पाच वर्षांपूर्वीच्या राजकारणाची त्यांच्याकडून पुनरावृत्ती होईल, असे राऊत यांना वाटले असावे. राऊत हे उद्धव ठाकरे यांच्याइतकेच पवार यांच्याशीही एकनिष्ठ आहेत. पवार समजून घेण्यासाठी शंभर जन्म घ्यावे लागतील, या स्वतःच्याच विधानावर त्यांची अपार श्रद्धा असली, तरी आपल्या या जन्मातच आपण पवार यांना पूर्ण समजून घेतले असा त्यांचा स्वतःवरचा विश्वास असल्याने मुख्यमंत्रिपदाचा भावी चेहरा म्हणून उद्धव ठाकरे यांचे नाव पुढे रेटण्यास राऊत यांनी सुरुवात केली; त्यामुळेच महाविकास आघाडीच्या तंबूत पसरलेली अस्वस्थता त्यांना कदाचित दिसलीच नाही. त्याआधी सोनिया गांधींनी कधीतरी स्तुती केल्याने राऊत यांना उद्धव ठाकरेंच्या पंतप्रधानपदाची स्वप्ने पडू लागली होती. ठाकरे हे महाराष्ट्राचेच नव्हे, तर देशाचेही नेतृत्व करू शकतात, असा वैचारिक षटकार मारून त्यांनी त्यावेळी महाविकास आघाडीतून स्वतःचे हसे करून घेतले होते. पण निष्ठा या आपल्या एकमेव गुणामुळे त्यांनी स्वतःच त्याकडे दुर्लक्ष करून ठाकरे यांच्या प्रतिमानिर्मितीचा वसा कायम ठेवला.

त्याचाच एक भाग म्हणून भावी मुख्यमंत्र्यांच्या रांगेत उद्धव ठाकरे यांचे नाव पहिल्या क्रमांकावर राहावे याकरिता राऊत यांनी बांधलेला चंग आणि त्यातून खुद्द ठाकरे यांना पडू लागलेली सत्तेच्या सिंहासनाची स्वप्ने यामुळे आता महाविकास आघाडीत पडलेला मिठाचा खडा पवार यांनी अलगद बाजूला केला आहे. गेल्या काही महिन्यांपासून ठाकरे-राऊत यांना महाविकास आघाडीच्या नेतृत्वाची चिंता सतावत होती. महाराष्ट्रात या आघाडीला ठाकरे यांच्याखेरीज अन्य कोणीच तारणहार नाही, असे वातावरण निर्माण करण्याचाही जोरदार प्रयत्न सुरू झाला. खुद्द ठाकरे यांनी त्यासाठी मोर्चेबांधणी सुरू केली होती. बाळासाहेब ठाकरे यांच्या काळातील राजकारण वेगळे होते. त्या काळात राज्याच्या राजकारणापासून देशाच्या राजकारणापर्यंतच्या कोणत्याही घडामोडींकरिता बाळासाहेबांनी साक्षीदार व्हावे, असे वाटणारा प्रत्येक नेता मातोश्रीचे उंबरठे झिजवत असे. या प्रथेला खुंटीवर टांगून विरोधकांच्या नाईलाजाच्या सर्वसमावेशक राजकारणात आपले स्थान निर्माण करण्याची भूमिका घेतल्यापासून उद्धव ठाकरे स्वतःच मातोश्रीच्या उंबरठ्यातून बाहेर पडू लागले. महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे नेतृत्व करण्याच्या आपल्या मनातील सुप्त आणि प्रलंबित आकांक्षेला काँग्रेस व विरोधकांच्या आघाडीतील अन्य पक्षांचा पाठिंबा मिळावा यासाठी त्यांनी थेट दिल्लीवारी केली. सोनिया गांधी यांचे आशीर्वाद घेऊन परतल्यानंतर महाराष्ट्रातील काँग्रेसचा पाठिंबा मिळेल अशी त्यांची अपेक्षा असावी, पण दिल्लीवारीत त्यांना अपेक्षित असे काहीच घडले नाही. अरविंद केजरीवाल यांच्या पत्नीची भेट घेऊन विरोधकांच्या आघाडीचा आणखी एक मोहरा गळाला लावण्याचा त्यांचा प्रयत्नही फारसा यशस्वी झाला नाही. केवळ भेटीगाठी करून परतलेल्या ठाकरेंनी स्वतःच आपल्या मोर्चेबांधणीचा नारळ फोडला. गेल्या ऑगस्टमध्ये त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा या वादग्रस्त विषयाला जाहीरपणे तोंड फोडले, तेव्हाच त्यांचा स्वप्रतिमानिर्मितीचा प्रयत्न स्पष्ट झाला होता. मात्र, जाहीर चर्चा घडवून आणण्याच्या त्यांच्या प्रयत्नांनाही काँग्रेसकडून कोणताच प्रतिसाद मिळाला नाही; उलट त्यांच्या प्रयत्नांना नकारात्मक असेच संकेत मिळत गेले. आता या वादावर पडदा टाकून शरद पवार यांनी ठाकरेंच्या उरल्यासुरल्या अपेक्षांनाही बासनात गुंडाळून टाकले आहे. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा निवडणुकीआधी जाहीर करण्याची गरज नाहीच; पण निवडणुकीनंतरही सत्ता मिळालीच तर उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीचे मुख्यमंत्रिपदाचे सर्वांच्या पसंतीचे उमेदवार नसतील, यावरही शिक्कामोर्तब झाले आहे.

आपल्या स्वप्रतिमानिर्मितीच्या प्रयत्नास प्रतिसाद मिळत नाही, हे पाहून उद्धव ठाकरे यांनी गेल्या महिन्यात एक पाऊल मागे घेतले. काँग्रेसने आणि पवार यांच्या गटाने निवडणुकीआधी मुख्यमंत्रिपदाचा चेहरा निश्चित करावा, त्यास आपला पाठिंबा राहील, असा नवा फासा ठाकरे यांनी जाहीर वक्तव्याद्वारे टाकून पाहिला, तेव्हाही त्यास काँग्रेस किंवा पवार यांच्याकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. राजकारणात आपले अस्तित्व उमटविण्याच्या प्रयत्नांना प्रतिसाद मिळाले नाहीत तर कोणासही अस्वस्थता येणे साहजिकच असते; पण नकारघंटा मिळाल्यास त्यामुळे होणाऱ्या मानहानीचे दुःख त्याहूनही अधिक अस्वस्थ करणारे ठरेल, हे त्यांना तेव्हा कळलेच नसावे. आता शरद पवार यांनी ठाकरे यांच्या त्या मागणीस धुडकावून लावून त्यांना या अस्वस्थतेचा थेट अनुभव दिला आहे. यामागे ठाकरे यांच्या राजकारणाचा पूर्वानुभव कदाचित पवार यांना उपयोगी पडला असावा. भाजपासोबत युती असताना, मुख्यमंत्रिपदाचे उमेदवार म्हणून देवेंद्र फडणवीस यांचे नाव ठाकरे यांच्या उपस्थितीतच जाहीर सभांतून उघड होत असतानाही, बंद खोलीतील कथित आश्वासनाचा हवाला देत ठाकरे यांनी युतीस रामराम केला, हे पवार यांना ठाऊक आहे. त्यामुळे या मुद्यावर फार काळ मौन न बाळगता त्याचा निकाल घेणे त्यांनी योग्य मानले असावे. त्या योग्य वेळाची योग्य संधी पवार यांच्यासमोर कोल्हापूरमधील पत्रकार परिषदेत बुधवारी चालून यावी, हा योगायोग नसावा. निवडणुकीआधी महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार ठरवावा, या ठाकरे यांच्या त्या विधानाकडे पवार यांचे लक्ष वेधण्यात आले आणि ती वेळ साधून पवार यांनी ठाकरे यांच्या मागणीस धोबीपछाड दिली. दुधाने तोंड पोळल्यावर ताक फुंकून पिणे शहाणपणाचे असते, हे वास्तव एवढ्या प्रदीर्घ अनुभवी असलेल्या पवार यांनाही मान्य करावे लागले, पण ठाकरे यांच्या ते कधी गळी उतरणार हे येणारा काळच ठरविणार आहे. पवार यांनी जाहीर खुलासा करून नेमके कान टोचले आहेत. आता उद्धव ठाकरे हे महाविकास आघाडीचे मुख्यमंत्रिपदाचे दावेदारही नाहीत आणि उमेदवारही नाहीत, हे स्पष्ट झाले आहे.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (३)

**प्राचार्य प्र. श्री. डोरले**

संपूर्ण पृथ्वीवर आपल्या बाहुबलाने राज्य करणाऱ्या पराक्रमी चक्रवर्ती, वीराग्रणी, वीरशिरोमणी 'भरत' या राजाच्या नावाने जम्बुद्वीपातील 'आर्यावर्त' या प्रदेशाचे नाव 'भारत' असे पडल्याचा इतिहास आहे; जो आपण पाहिला. याप्रमाणे द्वापारयुगापासून तो कलियुगापर्यंत म्हणजे विद्यमान २१ व्या शतकापर्यंत चालत आलेला हा आमचा राष्ट्रीय प्रवाह आहे. ज्याचा स्पष्ट उल्लेख महाभारतापासून पुढे अनेक पुराण ग्रंथांमध्ये अगदी सविस्तरपणे आलेला दिसतो. त्यामुळे 'आम्ही कोण?' म्हणून आपली ओळख सांगायची झाली तर आम्ही 'भरतवंशीय' म्हणजे भारतवासी भारताची संतान आणि वारसा हक्काने मिळालेला देश, राष्ट्र म्हणजे आमचा प्रियतम 'भारत' वर्ष! या प्रदीर्घ वाटचालीत पुढे 'सिंधू नदीच्या प्रदेशात राहणारे लोक म्हणजे हिंदू' असे नामाभिधान जगातील अनेकांनी आपले केले त्यामुळे ज्या देशात, राष्ट्रांत हिंदू राहतात तो 'हिंदुस्थान' अशी ओळख ऐतिहासिक वाटचालीत आपली झाली. द्वापारयुगात जो 'भरताचा भारत' तोच आज हिंदूंचा हिंदुस्थान. विश्वाच्या इतिहासातील हे एक निखळ सत्य आहे ते कोणी नाकारू शकत नाही. विसरू शकत नाही. ते आपण विसरावे म्हणून गोऱ्या साहेबांनी कुटिलतेने, बुद्धिभेद करण्यासाठी 'नेशन इन मेकिंग' आणि 'इंडिया दॅट इज भारत' या दोन फसव्या घोषणा दिल्या आहेत. त्याचा विचार करण्याची गरज नाही.

या वंशात प्रत्येक पिढीत अतिशय कर्तृत्ववान, पराक्रमी, चक्रवर्ती, राजे निर्माण झाले आहेत. त्यातील 'हस्ती' या सम्राटाने इंद्राच्या अमरावतीला शोभेल अशा एका महानगरीचे राजधानी म्हणून निर्माण केले; तेच पुढे 'हस्तिनापूर' झाले. भरतानंतरच्या पुढील ५५ व्या पिढीचा इतिहास म्हणजे कौरव-पांडवांचा इतिहास! यांच्याच पिढीमध्ये या श्रेष्ठ भरत वंशाच्या इतिहासाला ग्रहण लागले. एकसंध, एकरस असलेल्या भारताची द्वापारयुगात पहिली फाळणी झाली. त्या फाळणीचा इतिहास, त्यामुळे झालेले भीषण परिणाम त्याचा घटनात्मक क्रमवार मांडलेला तपशील महर्षी व्यासांनी 'महाभारत' या ग्रंथात मांडला आहे. कोणत्याही देशाची, वंशाची फाळणी का व कशामुळे होते? त्याची मानसिकता कशी असते? त्याचे सखोल विवेचन त्यांनी या ग्रंथात मांडले आहे. कालखंडाचा संदर्भ जरी भिन्न असला, तरी ज्या मानसिक वृत्तीचा हा संघर्ष असतो ज्या वृत्तींचा निर्देश महाभारताचा तत्त्वज्ञानात्मक, वैचारिक वारसा मांडणाऱ्या भगवद्गीतेत 'दैवी-असुरी संपदा' 'सत्त्व- रज-तम' या प्रकृतिसिद्ध तीन गुणांचा सृष्टीच्या सूक्ष्मातिसूक्ष्म स्तरावर चालणारा अखंड संघर्ष याच्या विवेचनातून स्पष्टपणे केला आहे. त्या दृष्टिकोनातून विचार केला तर आधुनिक भारतातील अनेक घटनांचा अन्वयार्थ सहजपणे लागतो.

**लढा वारसा हक्काचा** : कोणत्याही देशाची फाळणी ही त्या देशाच्या मालकी हक्कावरून, वारसाहक्कावरूनच होत असते. व्यवहारात आपण एकाच कुटुंबाचे, समान गोत्राचे भाऊबंद यांच्यात परस्पर सामंजस्याने, विचारविनिमयाने, गोडीगुलाबीने, परिस्थितिजन्य आवश्यकतेनुसार परंपरागत स्थावर इस्टेटीची विभागणी झाली, तर त्याला 'इस्टेटीची वाटणी' असे म्हणतो. हा प्रकार परस्परांच्या अनुमतीने झाला असल्याने त्यात भांडण, तंटा, संघर्ष, रक्तपात हा प्रकार घडलेला नसतो, पण फाळणी ही रक्तरंजितच असते. कारण यात आपला काहीही न्याय्य हक्क नसताना, आपला अधिकार नसताना, बळजबरीने दुसऱ्याच्या परंपरागत, वारसा हक्काने निसर्गतः त्यांना प्राप्त झालेल्या भूभागाचा, संपत्तीचा बळजबरीने अपहार करण्याचा, कब्जात घेण्याचा, त्यासाठी सर्व प्रकारच्या बलांचा, सैनिकी शक्तीचा वापर करण्याची आक्रमकता व तामसी वृत्तीचा विनियोग काही दुष्ट शक्तींकडून केला जातो. या दुष्ट, अपहार करणाऱ्या वृत्तीला धर्म म्हणून, कर्तव्य म्हणून जेव्हा खरे वारसदार विरोधासाठी आपला न्याय्य हक्क प्रस्थापित करण्यासाठी, आपल्या पूर्वजांनी प्राप्त करून ठेवलेल्या प्रदेशासाठी म्हणजे स्वदेशासाठी, म्हणजे प्रिय मातृभूमीसाठी संघर्ष करण्यास उभे ठाकतात त्यातून मग कुरुक्षेत्र, पानिपत अशा मैदानांवरील भीषण रणसंग्राम उभे राहतात. द्वापारयुगात झालेल्या फाळणीचा इतिहास म्हणजे महर्षी व्यासांच्या दिव्य प्रतिभेतून साकारलेले 'महाभारत' हे महाकाव्य आहे. या फाळणीचे गुन्हेगार म्हणून, सहभागी म्हणून कौरव आणि पांडव हे दोन पक्ष आहेत.

**इतिहासाची पुनरावृत्ती** : इतिहासाची पुनरावृत्ती होत असते, असे म्हणतात. या विधानाचा भावार्थ समजून घेणे आवश्यक आहे. काळ भिन्न असतो, परिस्थितीचा संदर्भ भिन्न असतो. घटना वर्तमानातील असतात, पण त्या घटनांना प्रेरित करणाऱ्या प्रेरणांचा, वासनांचा, विकारांचा मानसिक स्रोत हा युगानुयुगे प्रवास करीत विविध व्यक्तींच्या माध्यमातून प्रकट होतच असतो. त्याबरहुकूम घटना, प्रसंग आकार घेत असतात. कौरव आणि पांडव यांचा इतिहास आपल्याला विदित आहेच. त्या काळातील राजधर्माच्या परंपरेप्रमाणे, शास्त्राप्रमाणे कुरुवंशाचा अधिकृत राज्याधिकारी व वारस कोण होता? पांडू. त्याने काही दिवसांसाठी धृतराष्ट्राला राज्याचे अधिकार दिले (पॉवर ऑफ ॲटर्नी), पण हस्तिनापूरचे राज्य बळकविण्याचा व आपल्या दुर्योधन नावाच्या मुलाला राज्याचा वारस करण्याचे कुटिल प्रयत्न धृतराष्ट्र आणि त्यांच्या मुलांनी केला. त्यासाठी केलेले लाक्षागृह ते द्युतक्रीडा या घटना आपल्याला माहीतच आहेत. या 'धृतराष्ट्री' मानसिकतेचे वर्णन करताना श्री. दा. सातवळेकर म्हणतात- ''धृतराष्ट्र ही एक मानसिकता आहे. लोभ, देश आणि पुत्रमोह हे या मानसिकतेचे प्रमुख अंग आहेत. धृत-राष्ट्र म्हणजे राष्ट्राला घट्टपणे पकडून ठेवणारा. जे राष्ट्र आपले अधिकारात नाही त्यावर आपल्या पाशवी बलाने, कुटिलतेने, अन्यायाने ताबा ठेवणे. त्या राज्याचे खरे वारस जर ते परत मागू लागले तर त्यांना ते न देता बळजबरीने त्यांना युद्धास भाग पाडणे; पण राज्य न देणे.'' पुढे ते म्हणतात- ''सज्जनांच्या अतिद्वेषाने, पुत्रमोहाने, बल, संपत्ती आणि सत्ता यांच्या मदाने धुंद झालेली ही 'धृतराष्ट्रवृत्ती' न्याय आणि अन्याय, धर्म आणि अधर्म, कर्तव्य आणि अकर्तव्य, नीती आणि अनीती, युक्त आणि अयुक्त यांचा विचार करण्यास असमर्थ होत असते. चर्मचक्षूंनी जरी तो आंधळा असला, तरी खऱ्या विवेकाच्या दृष्टीनेच तो अंध बनलेला असतो. चर्मचक्षूंच्या अंधत्वापेक्षा त्याचे जे मानसिक आणि आत्मिक अंधत्व असते, ते फारच भयंकर असते.'' (पुरुषार्थ बोधिनी - पृ. क्र. २) संपूर्ण जागतिक इतिहासातील विविध कालखंडातील झालेल्या युद्धांचा तपशील आणि त्यामागील कारणीभूत असलेल्या मानसिकतेचा मागोवा घेतला तर याची सत्यता पटायला हरकत नसावी.

९८६०२९६१३१
(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

**संजय रामगिरवार**

# वर्दळीच्या मुख्य रस्त्यांवरून मोर्चे काढणे कितपत योग्य?

निवडणुका जवळ आल्या की शहरांत मोर्चांची संख्या अचानक वाढते. मिरवणुका तर वर्षभर चालतात. त्या होऊ नये असे अजिबात म्हणणे नाही. पण हे मोर्चे, मिरवणुका कुठून निघाव्या याचा विवेकशील विचार निश्चितपणे झाला पाहिजे. कारण सध्याचे मोर्चे, मिरवणुका या शक्तिप्रदर्शनाचे माध्यम झाले आहेत. ते शहराच्या वर्दळीच्या आणि मध्यभागातील मुख्य रस्त्यांवरून निघावे असाच साऱ्या राजकीय पक्षांचा, संघटनांचा आग्रह असतो. आग्रहच नाही तर अक्षरशः जबरदस्तीच असते. ते याचा मुळीच विचार करीत नाही की, त्यामुळे शहरांतील मुख्य रस्त्यांची रहदारी कमालीची प्रभावित होते. तासन्तास जाम लागतो. गाड्या तसुभर सरकायला मिनिटं लागतात. लोकांचा वेळ, पेट्रोल, डिझेल तर वाया जातेच; शिवाय प्रदूषणही होते. राष्ट्राच्या संपत्तीचा फिजूल खर्च होतो. सोबतच जनतेला होणारा मनस्ताप प्रचंड असतो. शेवटी ते सारेच दूषणे देत संतप्त मनाने कधीतरी उशिरा आपल्या घरी किंवा कार्यालयात पोहोचतात.

वाटायला गोष्ट छोटी आहे, पण ती डोंगराएवढी नक्कीच आहे. कुणालाच हे मोर्चे, मिरवणुका मुख्य रस्त्याने नको असतात. पण साऱ्यांचे हितसंबंध जुळलेले असल्याने, कोणत्याही राजकीय पक्षाला केव्हातरी मोर्च किंवा शक्तिप्रदर्शन करावेच लागणार असल्याने कोणताच पुढारी हा या गंभीर प्रश्नाला हात घालत नाही. सामाजिक संघटनाही एरवी प्रदूषण आणि वाहतुकीचा विषय



घेतात; पण मोर्चे, प्रदर्शन किंवा मिरवणुका मुख्य मार्गाने निघू नये म्हणून तेही काहीच बोलत नाही. कारण केव्हातरी त्यांनाही असे शक्तिप्रदर्शन करावे लागते. यात मोठी अडचण होते ती सामान्य माणसाची; तो काहीच बोलू शकत नाही. करू शकत नाही. चंद्रपुरात हा प्रश्न आणखी गंभीर आहे. कारण या महानगरात उरलेसुरले दोनच मुख्य रस्ते आहेत आणि तेही अत्यंत लहान, निमुळते होत गेलेले. त्यातही कस्तुरबा मार्गावरील शिवाजी चौकाकडे जाणारा मार्ग तर आहे की नाही, की बोळीच आहे, अशा स्थितीत आहे. रस्त्यांना लागूनच जुनी घरे आणि वर्षोन्वर्ष थाटलेली दुकाने असल्याने हे रस्ते वाढवताही येत नाही. दिवसेंदिवस महानगराच्या लोकसंख्येत वाढ होत असल्याने, वाहने वाढत असल्याने आणि रस्ते परंपरागत तोटकीच असल्याने वाहने तुंबतात. मोठा जाम लागतो तो 'प्राईम टाईम'मध्ये तर तासन्तास असतो. अशात एखादी मिरवणूक आली किंवा मोर्चा निघाला तर विचारूच नका, एवढा गोंधळ होतो. वाहतूक पोलिसांच्या नाकी नऊ येते. मग तुंबलेली वाहतूक दुसऱ्या कुठल्या तरी गल्लीबोळाच्या मार्गाने वळवली जाते. या साऱ्यात जनता भरडली जाते. अनेकदा या वाहतुकीच्या जाळ्यात रुग्णवाहिका अडकते. तिलाही जायला हे मोर्चेकरी मार्ग देत नाहीत. मध्यंतरी अशाच अडकलेल्या रुग्णवाहिकेत एका वृद्ध महिलेला मृत्यू झाला होता; किती हे भयंकर आहे! जवळपास असेच चित्र विदर्भातील अनेक शहरांचे आहे. पण कुठेच कुणीच पुढाकार घेऊन हे मोर्चे आणि मिरवणुका शहराच्या बाहेर नेत नाहीत. कारण तिकडे बघणारे कुणीच नसते. आपल्याला बघावे असे मोर्चेकऱ्यांना आणि मिरवणाऱ्यांना वाटत असले तरी त्यामुळे जनतेचा केवढा संताप होतो, याचा विचार कुणीच करीत नाही. पोलिसांनी अशा मोर्चे आणि मिरवणुकांवर मुख्य रस्त्यांवरून नेण्याची बंदी आणली तर त्यांचाही विरोध होतो. सत्ताधाऱ्यांचे फोन खणखणतात आणि शेवटी पोलिसांनाही नांगी टाकावी लागते. चंद्रपूर महानगरात तर आणखी एक विचित्र प्रथा पडली आहे. मोजून या महानगरात दोनच मुख्य मार्ग आहेत. दोन्ही मार्ग एकेरी आहेत. तरीही मोर्चेकरी यातील एका मार्गावर मुद्दाम विरुद्ध दिशेने मोर्चे नेतात. या मार्गावर जटपुरा नामक ऐतिहासिक द्वार आहे, ज्यातील एका लहानशा खिडकीतून एरवी अख्खी वाहतूक मार्गस्थ होत असते. हा मार्ग तसाही तुंबतो. त्यावर मोर्चा किंवा मिरवणूक निघाली की विचारायलाच नको, अवघा संतापच... यावर सत्ताधारी, विरोधक आणि विविध संघटनांनी चिंतन केले करणे गरजेचे आहे...

९८८१७१७८३२

## प्रासंगिक

# शरद पवार विरुद्ध उद्धव ठाकरे

**मोरेश्वर बडगे**

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक दोन-अडीच महिने लांबली आहे. दिवाळीनंतरच फटाके फुटतील. निवडणुकीचे वारे मात्र केव्हाच वाहू लागले आहेत. लोकसभेत फक्त ४८ जागा होत्या. विधानसभेत तर २८८ जागा आहेत. या सगळ्या जागांचे वाटप आणि तिथे उमेदवार निश्चित करणं ही दोन्ही आघाड्यांसाठी सर्कस आहे. महायुतीचे नेते सावधपणे खेळत आहेत. त्या तुलनेत महाआघाडीचे नेते आक्रमक दिसत आहेत. लोकसभा निवडणुकीत महाआघाडीने ४८ पैकी ३० जागा जिंकल्या. त्यामुळे विधानसभेसाठी आघाडीचा आत्मविश्वास दुणावला आहे. सत्तेची स्वप्नं पडायला लागली आहेत. अजून निकाल यायचाच आहे. मात्र, मुख्यमंत्रिपदाचा चेहरा कोण? यावरून महाआघाडीच्या नेत्यांमध्ये जुंपली आहे. याची सुरुवात शिल्लक सेनेचे सुप्रीमो उद्धव ठाकरे यांनीच केली. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा आधी ठरवा, असा आग्रह उद्धव यांनी शरद पवार आणि नाना पटोले यांच्या समक्ष केला. पवार आणि पटोले त्यावर गप्प राहिले. पण आता रणकंदन सुरू झाले आहे. ठाकरे विरुद्ध पवार असे नाजूक वळण निवडणुकीला मिळाले आहे. चेहऱ्यासाठी एवढा वाद, जागावाटपात तर हाणामारी होणार. तुम्ही लिहून ठेवा. काँग्रेसचा उमेदवार दिल्लीत ठरतो आणि सोनिया गांधी ते ठरवतात, याची उद्धव ठाकरे यांना छान कल्पना आहे. तरीही त्यांनी जाहीरपणे हा प्रश्न उपस्थित केला. चेहरा नसेल तर पाडापाडी होते, अशी भूमिका त्यांनी मांडली. चेहरा मागण्यामागे उद्धव ठाकरे यांचे निश्चित काही दबावतंत्र असावे. तसे नसते तर मुख्यमंत्रिपदाचा चेहरा जाहीर करण्याचे ते व्यासपीठ नव्हतेच. तरीही ठाकरे बोलले. मुख्यमंत्रिपदात आपल्या पक्षाला रस नाही, असे पुढे काही दिवसांनी सांगून पवारांनी उद्धव ठाकरेंच्या आशा उंचावल्या. उद्धव दिल्लीचा तीन दिवसांचा दौरा करून आले. पण शरद पवारांच्या नाहीमध्ये हो दडले असते, हे त्यांना माहीत नसावे. लवकरच त्याची प्रचीती आली. शरद पवारांनी आता उलटी भूमिका घेतली आहे. हा माणूस कधी काय बोलेल, कधी पलटेल याचा भरवसा नाही. मुख्यमंत्रिपदात रस नाही म्हणणारे शरद पवार दहा दिवसांत निवडणूक जिंकायची भाषा करतात. हा रस कुठून आणि कोणासाठी आला? कोण विश्वास ठेवेल यांच्यावर? महाआघाडीचे सगळे नेते असलेच नमुने आहेत. जिधर बम, उधर हम. मुख्यमंत्रिपदाचा चेहरा निवडणूक निकालानंतर ठरेल, असे शरद पवारांनी कोल्हापूरमध्ये जाहीरपणे सांगितले. ज्याच्या जागा जास्त त्याचा मुख्यमंत्री हे सांगायलाही पवार विसरले नाहीत.




एक प्रकारे पवारांनी उद्धव यांना त्यांची जागा दाखवून दिली. उद्धव आणि त्यांचे हनुमान यांची रंगबाजी आता चालणार नाही. त्यामुळे उद्धव यांच्या स्वप्नांना सुरुंग लागला आहे. उद्धव ठाकरे यांची व्होट बँक एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने केव्हाच हायजॅक केली आहे. ठाकरेंकडे आता मतं आहेत कुठे? संजय राऊत यांनी तर उद्धव यांची मतं खराब करण्याचा जणू विडाच उचलला आहे. मुस्लिम मतं लोकसभेत त्यांना मिळाली. पण आता विधानसभेत ती मिळणार नाहीत. प्रकाश आंबेडकर यांना पकडून दलितांची मतं खेचायचा त्यांचा डाव काँग्रेसने केव्हाच हाणून पाडला. महाआघाडीमध्ये आपणच सर्वोच्च नेते आहोत या भ्रमात उद्धव होते. सांगलीची जागा काँग्रेसची होती. उद्धव यांनी परस्पर तिथे आपला उमेदवार उभा केला. तो आपटणारच होता. आपटला. मात्र, या डावात उद्धव यांनी उगाच काँग्रेसशी पंगा घेतला. कागदावर महाआघाडी भक्कम दिसत असली तरी आतून पोकळ आहे. उद्धव आज एकदम एकटे आहेत. काँग्रेसच नव्हे तर शरद पवारही आता त्यांच्याकडे संशयाने पाहत आहेत.

गेल्या ५० वर्षांत पवारांना कोणी समजू शकलेले नाही. उद्धव ठाकरे यांनीही मार खाल्ला. भाजपासोबत युतीत राहिले असते तर उद्धव मजेत असते. मुख्यमंत्रिपद देतो असे सांगून पाच वर्षांपूर्वी पवारांनी उद्धव यांना भाजपापासून तोडले. काँग्रेसला सोबत आणून महाआघाडी बनवली. मुख्यमंत्रिपदी बसवले. मात्र, तो त्यांचा गेम होता. उद्धव त्यात फसले. आता कितीही आदळआपट केली तरी उपयोग नाही. शरद पवार हळूहळू आपले पत्ते खुले करीत आहेत. त्यांना आपल्या मुलीला राज्याची पहिली महिला मुख्यमंत्री करायचे आहे. दहा वर्षांपूर्वी पाहिलेले ते स्वप्न हाताशी आलंय, असे त्यांना वाटतंय. शरद पवार फुकटात पावसात भिजत नाहीत. या वयात ते महाराष्ट्र पिंजून काढत आहेत. फोडाफोडी करून मिशन सुप्रियाची तयारी चालवली आहे. इकडचे तिकडचे अडचणीतले दबंग नेते पकडायचे, त्यांना तिकीट द्यायचे आणि सत्ता गाजवायची. पवार गेली ५० वर्षे हेच करीत आले. भाजपामधले काही नेते यावेळीही त्यांच्या गळाला लागतीलही. हर्षवर्धन पाटील यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे. शरद पवार यांची हवा सुरू आहे, असा एक फेक नॅरेटिव्ह मीडियाने उभा केला आहे. उद्धव यांच्याबद्दल सहानुभूती आहे, हाही त्याच फसव्या प्रचाराचा भाग. पण तुम्ही लिहून ठेवा, लोकसभा निवडणुकीत भाजपाला दणका बसला असे सांगितले जाते; पण ते अर्धसत्य आहे. लोकसभा निवडणुकीत २०१४ मध्ये भाजपाला ३१ टक्के मतं आणि २८२ जागा मिळाल्या होत्या. २०१९ च्या निवडणुकीत ३८ टक्के घेऊन भाजपाने ३०३ जागा जिंकल्या होत्या. आता झालेल्या निवडणुकीत भाजपाला ३७ टक्के मतं मिळाली. एक टक्का मतं कमी घेतली. त्यामुळे २४० जागांवर थांबावे लागले. महाआघाडीला ४८ जागांपैकी ३० जागा मिळाल्या असल्या तरी आघाडी आणि युती यांच्या मतांचा फरक फक्त दोन लाखांचा आहे. जागांच्या आकड्यात भाजपा हरला. येत्या विधानसभा निवडणुकीत दोन लाखांचा फरक चुटकीनिशी भरेल. हेही झाले नसते. पण कार्यकर्त्यांकडे दुर्लक्ष झाले. त्याचा हा तडाखा आहे. युती भक्कम करण्यासाठी अजित पवारांना भाजपाने जवळ केले. शिंदेंच्या शिवसेनेची मतं भाजपाला मिळाली. मात्र, अजितदादांची मतं भाजपाला म्हणजे महायुतीला ट्रान्सफर झालीच नाहीत. मराठा फॅक्टर यावेळी कसा काम करतो ते पाहायचे. पडायचे की लढायचे याचा निर्णय मनोज जरांगे अजून करू शकले नाहीत. समाज त्यांच्या पाठीशी आहे हे मानलं तरी मराठा समाजात इतर पक्षांचेही नेते आहेत. जरांगे लढताहेत म्हणून इतर राजकीय पक्षातले नेते लढणार नाहीत अशातली परिस्थिती नाही. यावेळी मैदानात कधी नव्हे एवढे असंख्य उमेदवार उतरलेले दिसतील. मोठ्या प्रमाणात बंडखोरी होईल. अपक्ष उमेदवार रेकॉर्ड प्रमाणात असतील. मोठ्या प्रमाणावर मतविभाजन होईल. या मतविभाजनाचा महायुतीला फायदाच होईल. पश्चिम महाराष्ट्रापुरते शरद पवार चालतील. इतरत्र महायुती मोठी कमाई करेल. लोकसभेत भाजपाचे मतदार म्हणावे तेवढे मतदानाला गेले नव्हते. यावेळी धोका होणार नाही. यावेळचे निकाल धक्कादायक असतील.

९८५०३०४१२३
(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### श्रीगणपती

सर्व देवांमध्ये अग्रपूजेचा मानकरी असलेल्या श्रीगणेशाचे रूप अत्यंत अनुपम असे आहे. सर्व प्राणिमात्रांमध्ये हत्ती हा अत्यंत बुद्धिमान म्हणून ओळखला जातो. त्याचं डोकं गणपतीच्या मस्तकावर विराजमान आहे. डोळे बारीक असले तरी कोणत्याही वस्तूच्या वास्तविक स्वरूपापेक्षा ती मोठ्या स्वरूपात पाहण्याची क्षमता त्याच्यात आहे.



त्यामुळे तो दूरदृष्टीने प्रत्येक गोष्टींच्या परिणामांचा विचार करून तपासून पाहतो. त्याचे सुपासारखे कान असे संकेत देतात की योग्य आणि श्रवणीय असेच ऐकावे. ऐकताना वाईट गोष्टी बाहेरच ठेवून फक्त चांगल्या गोष्टी ऐकून मन बुद्धीपर्यंत जाऊ देण्याची व अमूल्य वेळेचा सदुपयोग करण्याची शिकवण देतात. गणपती आपल्या मोठ्या पोटात चांगल्या-वाईट, अनुकूल-प्रतिकूल अशा सर्व अनुभवांना सामावून सहन करण्याची शिकवण देतो. वाईट प्रवृत्तींना धडा शिकविण्यासाठी त्याच्या चार हातांपैकी दोन हातात शस्त्रे आहेत, एक हात आशीर्वादाचा आणि एका हातात ज्ञानरूपी मोदक आहे. ज्ञानाचा अहंकार होऊ नये म्हणून त्याने मोदक न खाता हातात सांभाळून ठेवला आहे. सर्वांना समान दृष्टीने पाहणारा म्हणून एकदंत आहे. तोंड लहान म्हणजे विनम्र आणि मितभाषी आहे. त्याचा एक पाय जमिनीवर असतो. वाहन उंदीर जो अत्यंत चपळ आहे. आपल्या चंचल मनाला आवर घालण्याची शिकवण देतो. अशा सर्वगुणसंपन्न श्रीगणेशाचे गुण आमच्या अंगी येण्यासाठी आपण त्याला कृतज्ञतापूर्वक प्रार्थना करून हा उत्सव आदर्श पद्धतीने कसा साजरा करता येईल याची काळजी घेऊया. त्यामुळे या उत्सवाचे धार्मिक महत्त्व जोपासले जाऊन, सामाजिक उत्तरदायित्व निभावता येईल.

**अंजली श्रीकांत पाध्ये**/९९७५५३६९०६

## वाचक पत्रे

### 'पॉलिग्राफ'ला मान्यता नसावी

पॉलिग्राफ (लाय डिटेक्टर) चाचणीला जरी न्यायदानाच्या वेळी पूर्ण पुरावा म्हणून धरला जात नाही तरी गुन्हा सिद्ध करण्यासाठी या चाचणीतील निष्कर्षांचा आधार घेता येतो. सर्वच आरोपींना स्वतःबद्दल माहीतच असते की, त्यांनी संबंधित गुन्हा केला किंवा नाही. असे माहीत असल्यामुळे असे आरोपी, पण प्रत्यक्षात गुन्हेगार, लाय डिटेक्टर टेस्टला होकार देऊन आपल्याच पायावर धोंडा कशाला पाडून घेणार? त्यामुळे साक्षी-पुराव्यांच्या आधारावर जर न्यायालयाला वाटले की, विशिष्ट प्रकरणामध्ये पॉलिग्राफ चाचणी आवश्यक आहे तर ती जरूर करण्यात यावी; जेणेकरून गुन्ह्याची उकल होणे सोयिस्कर होईल. इथे आरोपींच्या पूर्वपरवानगीच्या अटीचा नियम नेहमीसाठी रद्द करण्यात यावा.

**डॉ. तुषार झाडे**/९३२५१८५३०७

### समर्थांची यशोगाथा 'रघुवीर'

समर्थ श्रीरामदास स्वामी यांच्या जीवनावर आधारित 'रघुवीर' हा चित्रपट बघण्याचा योग आला. त्यांचे रोमांचकारी चरित्र, काही घटनांचे चित्रण यात आहे. सर्वांनी आवर्जून बघावा असा हा चित्रपट. त्यांच्या कार्याचा परिचय व त्यांनी समाजाला दिलेले विचार यात दर्शवण्यात आले आहेत. संपूर्ण आयुष्य दोन-तीन तासांत दाखविणे कदापि शक्य नाही. बालपणीचा काळ हा सवंगड्यांसोबतचा लहानपणीचे खेळ, अडलेल्यांना मदत करणे असे प्रसंग दाखविलेले आहेत. नारायणाच्या करामतींनी आईला चिंता वाटून तिच्या जीवाला घोर लागतो, लग्न हा एक उपाय असे आईला वाटणे योग्यच, हे चित्रण फार सुंदर केले आहे. नारायण ते समर्थ रामदासस्वामी असा त्यांचा जीवनप्रवास यात सुंदररीत्या उलगडून दाखविला आहे. अंधश्रद्धा, मानसिक दौर्बल्य दूर करणे तसेच बलोपासना, एकीचे बळ याला स्थान दिलेले आहे. चुकीच्या व्यक्तीला अद्दल घडविणे दाखवले आहे. लग्नमंडपातून पळून गेलेल्या नारायणाचा पुढचा प्रवास तपसाधना, औषध, ग्रंथांचा अभ्यास, भ्रमंती, तरुणांसाठी आखाडे उभारणे, प्रेरणा देणे, उद्धव व कल्याणसारख्या शिष्यांना घडविण्याचे उत्तम चित्रण या चित्रपटात दर्शविले आहे. दासबोध, मनाचे श्लोक लिहिणे सर्वांसाठी आजही मार्गदर्शक आहेत.

आदिलशाहीला न घाबरणारे, न झुकणारे श्रीरामदास्वामी श्रीरामाचे दास असल्याचे यवनांना ठणकावून सांगतात. एकत्रीकरणासाठी मंदिर, आखाडे उभारतात. श्रीशिवाजी महाराजांसोबत असलेल्या नात्यांचा प्रसंगही थोडक्यात दाखविला आहे. विधवा वेणाबाईंना दिलेली दीक्षा आणि मठाची दिलेली जबाबदारी, ती पार पाडावी म्हणून स्त्रीला दिलेले अधिकार हा प्रसंग छान आणि महत्त्वपूर्ण वाटतो. चित्रपट माहितीप्रधान असून निश्चितच कौतुकास्पद आणि प्रेरणा देणारा आहे. श्रीसमर्थांचे समर्थ रूप निर्मात्याने दाखविले आहे. शेवटी कल्याणकारी रामराया या प्रार्थनेची आठवण झाली. एकंदरीत चित्रपट छान झाला आहे. सर्वांच्या भूमिका योग्य व न्याय देणाऱ्या आहेत. नारायण आणि रामदास स्वामींची भूमिका उत्कृष्ट अभिनयाने साकार झालेला चित्रपट.

**प्रा. कीर्ती काळसर्पे**/८६००४६९२००

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# स्वप्न वाहतांना पाहिले; तुम्हीच सांगा जगावं कस?

शिवाजी आकात



**सेलू,/प्रतिनिधी:** तालुक्यामध्ये शनिवार ३१ ऑगस्ट व १ सप्टेंबर या दोन दिवसात पडलेल्या अतीपावसामुळे शेती पिकासह पशुधन तसेच घरांची पडझड झाल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले तर उभी असलेली शेती पिके कापुस,सोयाबीन,तुर पाण्यात वाहुन गेली असल्याने वर्षभराची शेतक-यानी पाहिलेली स्वप्ने वाहतांना पाहिले असा आक्रोश राज्याच्या कृषीमंत्री धनंजय मुंढे यांच्यासमोर करत मायबाप सरकार तुम्हीच सांगा जगाव कस ?असा सवाल उपस्थित केला.

बुधवार ४ रोजी जिल्ह्याच्या दौ-यावर असलेले कृषीमंत्री धनंजय मुंढे यांनी तालुक्यातील ढेंगळी पिंपळगाव शिवारात शेतक-यांच्या नुकसानग्रस्त शेती पिकांची पाहणी केली.यावेळी महसुल,कृषी विभाग,पंचायत समिती विभागाच्या अधिका-यांसह शेतक-यांची उपस्थिती होती.तालुक्यात बोरकीनी येथील शेतकरी ज्ञानेश्वर जनार्धन हावळे व विठ्ठल जनार्धन हावळे यांच्या शेळीपालनात पुराचे पाणी घुसल्यामुळे ७५ शेळ्या पैकी ७२ शेळ्या मृत्युमुखी पडल्या तसेच यागावात अनेक दुचाकी व चारचाकी वाहने पुराच्या पाण्यात वाहुन दुरपर्यंत आली.तर वाई येथील शेतक-यांचे गायी,बैल,वासरे पुराच्या पाण्यात वाहुन गेल्याने नुकसान झाले तर या महाप्रलयकारी पुरामुळे कापुस,सोयाबीन,तुर, मुग ही पिके पाण्याखाली आली. तालुक्यात साळेगाव,हातनुर,रायपुर,चिकलठाणा,खेर्डा,धामणगाव,म्हळसापुर,गोहेगाव,ढेंगळी पिंपळगाव आदीसह इतरही गावांमध्ये शेतीपिके क्षेत्र बाधीत झाले आहेत.मोठ्या उमेदीने शेतक-यांनी पिक पेरणी करुन जगवलेली पिके काही क्षणात डोळ्यासमोर वाहतांना दु:खाचा होणारा त्रास सहन होण्यासारखा नसुन यामुळे दोन वर्षाचे आर्थीक नियोजन बिघडणार आहे. शासकिय मदतीची तात्काळ गरज तालुक्यात झालेल्या अतिपावसामुळे शेतीपिकासह पशुधन,घरे आदींचे नुकसान झाले आहे यामुळे यातुन सावरण्यासाठी शेतक-यांना तात्काळ नुकसान मिळावे अशी मागणी शेतक-यातुन होत आहे. यावेळी नुकसानीमुळे अनेक शेतकरी हतबल झाले असून पिकांचे मोठी हाणी झाली.



## जिंतूर तालुक्यात अतिवृष्टीने पिकांचे सर्वाधिक नुकसान

### रहिवासी भागात पाणी घुसले असल्याने झालेल्या नुकसानीमुळे जिंतूर तालुका ओला दुष्काळ जाहीर करा- ॲड. सुनील बुधवंत,जिंतूर

**जिंतूर/ प्रतिनिधी-** रहिवासी भागात पाणी घुसले असल्याने झालेल्या नुकसानीमुळे जिंतूर तालुका ओला दुष्काळ जाहीर करा- ॲड. सुनील बुधवंत,जिंतूर यांनी केले आहे. जिंतूर- तालुक्यात सप्टेंबर महिन्याच्या मध्यरात्रीपासून अतिवृष्टी पावसामुळे शेतकऱ्यांचे पिकांचे नुकसान व रहिवासी भागात पाणी घुसले असल्याने शेतीचे व रहिवासी भागात पाणी घुसले असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. अनेक तालुक्यातील पिके पाण्याखाली गेली असून शेतकऱ्यांचा हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. संपूर्ण पीकेच पाण्याखाली वाहून गेली आहेत. मागील दोन दिवसात मुसळधार पावसामुळे काढणीला आलेले सोयाबीन, मुग, उडीद, भुईमूग आदी पिके नामशेष झाली आहेत. तर कपाशी, मका, उस, मोसंबी, बाजरीची पिके आडवी झाली आहेत. शेतकऱ्यांच्या शेतांमध्ये गुडघाभर पाणी साचले असून पिके पिवळी पडत आहेत. नद्या, ओढे दुथडी भरून वाहत असून अनेक ठिकाणी पाझर तलाव फुटल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत त्यामुळे जिंतूर तालुका ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी ॲड. सुनील बुधवंत, जिंतूर यांनी मा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली.

## संक्षिप्त वृत्त...

### पीएमश्री के.प्रा.शाळा डासाळा येथे शिक्षक दिन साजरा

**सेलू,/प्रतिनिधी:** तालुक्यातील पीएमश्री जि प के प्रा शा डासाळा येथे भारतरत डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन तसेच महानुभाव पंथाचे संस्थापकश्री चक्रधर स्वामी यांचा अवतरण दिन गूरुवार ५ सप्टेंबर रोजी साजरा करण्यात आला.यावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुशील शिखरे, सुनील हिवाळे,मधूकर काष्टे आदींची उपस्थिती होती.शंभूराजे प्रतिष्ठान व दीपस्तंभ प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेत निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते वर्ग ४ ते ६ वी या गटासाठी माझे आदर्श शिक्षक व ७ ते ९ वी गटासाठी माझ्या नजरेतील उद्याचा भारत हे निबंधासाठी विषय होते तसेच वर्ग ४ ते ६ व वर्ग ७ ते ९ या दोन्ही गटासाठी मोबाईल शाप कि वरदान हा वक्तृत्व स्पर्धेसाठी विषय होता शाळेमधील सर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त पणे वरील स्पर्धामध्ये सहभाग घेतला या स्पर्धा मध्ये पुढील विद्यार्थ्यांना प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त झाले.
निबंध स्पर्धा गट एक वर्ग ४ ते ६
प्रथम क्रमांक-करण दत्तात्रय गजमल
द्वितीय क्रमंक-आरती विठ्ठलराव कदम
तृतीय क्रमांक-वेदिका गजानन गजमल
गट क्रमांक दोन वर्ग ७ ते ९
प्रथम क्रमांक- मानवी हनुमंत गजमल
द्वितीय क्रमांक- अक्षदा दीपक खराबे
तृतीय क्रमांक ऋतुजा ज्ञानेश्वर बोंबले
वक्तृत्व स्पर्धा गट एक इयत्ता ४ ते ६
प्रथम क्रमांक गायत्री रामराव गजमल
द्वितीय क्रमांक स्वरा उद्धव गजमल
तृतीय क्रमांक सांची प्रकाश भालेराव
गट २ इयत्ता ७ ते ९
प्रथम क्रमांक- प्राची अंगद गजमल
द्वितीय क्रमांक -साक्षी भगवान गजमल
तृतीय क्रमांक अभिनव ताराचंद खराबे सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्या बक्षीस म्हणून वाटप करण्यात आले शिक्षक दिनानिमित शाळेतील सर्व शिक्षकवृन्दांचा शाळा व्यवस्थापन समिती व गावकरी यांनी एक सुंदर रोपटे व पेन देऊन सत्कार केला कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व्यवस्थापन समिती सदस्य गावकरी व सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

### भटके विमुक्त व आदिवासी संयोजन समितीची यात्रा ९ सप्टेंबरला परभणीत

**परभणी,/प्रतिनिधी :** कोणत्याही प्रकारचे परिवर्तन व क्रांती करताना दोन गटांमध्ये निकराचा व निर्णायक संघर्ष अटळ असतो,,तीच लढाई जर सत्तेची असेल तर मग काही वेळा रक्तपात व हिंसाचारही घडत असतो, परंतु आपल्या देशाने संविधान स्विकारल्याने व आंबेडकर,गांधींचे आपण पाईक असल्याने आपणास रक्तरंजीत क्रांती मान्य नाही,,,आपण परिवर्तनावर विश्वास असणारी मंडळी असल्याने आपण रक्ताचा एकही थेंब न सांडता समाजात बदल घडवण्यासाठी प्रयतशील आहोत.
घडलेही तसेच,,, भटके विमुक्त आदिवासी संयोजन समितीच्या वतीने राज्यव्यापी संवादयात्रा काढण्यात आली आहे.ही यात्रा अभुतपुर्व, ऐतिहासिक व क्रांतिकारी आहे.आजपर्यंत उपेक्षित असलेला भटके विमुक्त घटक आपल्या संविधानिक हक्क अधिकारासाठी जागृत होऊन आपल्या मुलभूत व प्राथमिक अशा तब्बल १७ मागण्यांसाठी ४२ विमुक्तभटक्या जमाती मिळून,४० तालुके,२० जिल्हे,५ विभाग व ६००० किमी.प्रवास करणार आहे. त्या दरम्यान संवाद यात्रा ९ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ठीक दहा वाजता परभणी मध्ये येत आहे. ही यात्रा जुनी जिल्हा परिषद येथून सुरुवात होऊन त्या ठीक दुपारी साडेबारा वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील उपोषण मैदाना मध्ये सभेत रूपांतरित होणार आहे. ही संपूर्ण संवादयात्रेचे महाराष्ट्रातील भटके विमुक्त आदिवासी या वंचित घटकासोबत.
विधायक कार्य करणाऱ्या १०० हून अधिक संस्था, संघटनांनी मिळून नियोजन केले आहे. भटके विमुक्त आदिवासी व वंचित घटकांना एकत्र करून,त्यांचे नवे व नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी प्रयत आहे.

सोलापूर तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३



## मौ.कुऱ्हाडी सरपंच राठोड यांचा सामाजिक जाणिवेतून वाढदिवस साजरा

**जिंतूर/ प्रतिनिधी-** विद्यार्थ्यांनी आपले सामाजिक भान जपण्याबरोबरच त्यांच्यामध्ये आपल्या कर्तव्याची जाणीव निर्माण व्हावी, यासाठी जि. प. प्रा. शा कुऱ्हाडी येथील शाळेत कुऱ्हाडी गावाचे सरपंच संतोष राठोड यांनी आपला वाढ़दिवस विद्यार्थ्यांबरोबर सामूहिक पद्धतीने व साध्या पद्धतीने साजरा केला.
विद्येची आराध्य देवता सरस्वती मातेच्या प्रतिमेचे सर्व मान्यवरांच्या हस्ते पूजन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली.
पाश्चात्त्या पद्धतीचा प्रभाव आपल्या संस्कृतीबरोबरच दैनंदिन जीवनात अगदी वाढदिवस साजरा करण्याच्या पद्धतीवरही पडला आहे.
वाढदिवसाला औक्षण करण्याची पद्धत बदलून त्याची जागा अनेक नको त्या पद्धतींनी घेतला. मात्र या गोष्टींना फाटा देत येथील तरुण आणि लोकप्रीय सरपंच संतोष राठोड यांनी आपण ज्या शाळेत आपल्या भविष्याचे धडे गिरवलो आणि ज्या समाजात वाढलो त्याचे आपणही काही देणे लागतो या कृतज्ञ भावनेतुन बाळ गोपाळाच्या सहवासात आपला वाढ़ दिवस साजरा केला.
शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती यावेळी विद्यार्थ्यांना भेटवस्तू ही देण्यात आले
या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून दहेगाव चे सरपंच परमेश्वर ढोणे कावी चे सरपंच रामा काठमोरे व कोरवाडी गावचे सरपंच दिनकर अलाटे गावचे उपसरपंच राहूल चव्हाण ग्रा .पं.सदस्य प्रल्हाद सरकटे,रंगनाथ ईंझे, काशिनाथ घंदारे व पोलीस पाटील बंडू चव्हाण, कल्याण ईंझे, माणिक

## आ.मेघना साकोरे यांनी केली पूरग्रस्त भागाची पाहणी

### जिंतूर व सेलू मतदारसंघातील भागाचा दौरा



**जिंतूर,/प्रतिनिधी-** आ. मेघनाताई बोर्डीकर यांनी केली पूरग्रस्त भागाची पाहणी केली.
जिंतूर सेलू मतदार संघातील आमदार बोर्डीकर यांनी जिंतूर व सेलू या दोन्ही तालुक्यातील झालेल्या पावसाने पुराचे पाणी शिरलेल्या विविध भागांमध्ये भेटी देऊन झालेल्या नुकसानीची पाहणी केली.
पूरग्रस्त नागरिकांना भेटी देत चर्चा करून मेघना बोर्डीकर यांनी नागरिकांना दिलासा दिला यावेळी पुरामुळे घरात पाणी शिरून झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनास दिले.
मागील दोन दिवसात झालेल्या मुसळधार पावसामुळे तालुक्यातील अनेक ओढे, नाले व नद्यांना पूर येऊन नदीकाठच्या अनेक शेतामध्ये व वस्त्यांमधील घरामध्ये पाणी शिरले होते.
या पाण्यातून मार्ग काढीत आमदार मेघना दीदी बोर्डीकर यांनी पूरग्रस्त भागात भेट देऊन तेथील नुकसानगृस्थ नागरिकांची व शेतकऱ्यांची कैफियत ऐकून घेतली व नागरिकांचे प्रश्न सोडविणार असल्याचे आश्वासन दिले.
अतिवृष्टी मुळे पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसान झालेल्या पिकांचे पाहणी करून पंचनामे करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.
नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी सर्वोत्परी प्रयत करेल असा विश्वास आमदार मेघना बोर्डीकर यांनी शेतकऱ्यांना दिला.
यावेळी तहसीलदार, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, उपस्थित होते.
वेळ कठीण आहे, पण मी भक्कम आहे, आपण जिंतूर सेलूकर संकटाला भिणारे नाहीत तर त्याला सामोरे जाणार आहोत, या संकटाच्या काळात तुमची दीदी, तुमची आमदार तुमच्या सदैव पाठीशी आहे. असा विश्वास नागरिक व शेतकरी बांधवांना दिला.



जिंतूर- नितेश राणे आमदार विधानपरिषद सदस्य यांनी दि.०६ सप्टेंबर अहिल्यानगर येथे मुस्लिम समजा विषयी चितवणीखोर वक्तव्य केल्याच्या निषेधार्थ प्रशासनास निवेदन देण्यात आले.

## ३० सप्टेंबरला खासदारांची बैठक

**परभणी / प्रतिनिधी-** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागांतर्गत सर्व खासदारांची ३० सप्टेंबर रोजी रेल्वे प्रश्नावर बैठक होणार आहे. तब्बल तीन वर्षानंतर दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड विभागातील विविध रेल्वे प्रश्नांवर ही बैठक आयोजित केली आहे. त्यामुळे या बैठकीस महत्व प्राप्त होत आहे.
दरम्यान, या बैठकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार श्रीमती फौजिया खान यांनी मंगळवारी (दि.०३) मराठवाडा रेल्वे प्रवाशी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांबरोबर हितगुज केले व त्यांच्याद्वारे रेल्वे विषयक प्रश्न जाणून घेतले. यात नांदेड-पुणे या मार्गावर दिवसा एक्सप्रेस सुरु करावी, नांदेड-वास्को(गोवा) नवीन गाडी सुरु करावी, कोविडपूर्व नांदेड-औरंगाबाद एन्टरसिटी गाडी पुन्हा सुरु करावी, पुणे तसेच पनवेल एक्सप्रेसला कायमस्वरुपी तीन कोचेस जोडावेत, औरंगाबाद-अकोला, पंढरपूर-शेगांव नवीन गाड्या सुरु कराव्यात, रायचूर-परभणी, पटना-पूर्णा रेल्वेचा विस्तार जालना पर्यंत करावा, परभणी रेल्वे स्थानकावर अमृत भारत योजनेंतर्गत कामे करण्यात येणार आहेत.

## विद्यार्थ्यांनी घातला शिक्षणाचा जागर; शिक्षक दिनानिमित्त कार्यक्रम

**सेलू ,/प्रतिनिधी:** डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन जयंती, भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांचा अवतार दिन आणि शिक्षक दिनानिमित्त गुरुवारी (ता.पाच ) सेलू येथील नूतन विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून शिक्षणाचे महत्व अधोरेखित करीत शिक्षणाचा जागर घातला.
अकरा विद्यार्थ्यांनी यानिमित्ताने विचार मांडून उपस्थितांची दाद मिळवली. पालक शिक्षक संघाच्या वतीने गुरुवारी (पाच सप्टेंबर) आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक संतोष पाटील होते. याप्रसंगी उपमुख्याध्यापक के.के. देशपांडे, पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष प्रा.संजय पिंपळगावगावर, शुभदा सुभेदार, माधवी पिंगळे, वाल्मिक खुळे, सतीश जाधव, सुनील गायकवाड, लक्ष्मण सोळंके, जयदत्त बावणे, वंदना पाटील, गोरखनाथ घायाळ, शोभा घायाळ, वैशाली लव्हाळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि भगवान सर्वज्ञ श्री चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. जेष्ठ शिक्षक संतोष पाटील, गोरखनाथ घायाळ यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार व भेट वस्तू देऊन सपतीक विशेष सत्कार करण्यात आला. तसेच सर्व शिक्षकांचा भेटवस्तू व गुलाब पुष्प देऊन विद्यार्थ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. भारतीय स्टेट बँकेच्या वतीने शाखा व्यवस्थापक अनंत घावडे, प्रवीण जायभाय, रवि घनसावंत यांनी सर्व शिक्षकांना शुभेच्छा दिल्या. या वेळी इयत्ता पाचवी ते आठवीतील हर्षदा वाघमारे, अनुजा धापसे, आरिजखान पठाण, गजानन ढवळे, सिद्धी शेरे, अनुष्का नरवडे, आराध्या साखरे, शिक्षा खुळे, सृष्टी कटारे, श्रद्धा ताठे, रोहन वाघमारे या विद्यार्थ्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेत सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत शिक्षणाचे महत्व विषद केले.



प्रास्ताविक पी.टी.कपाटे यांनी केले. सूत्रसंचालन अनुजा सुभेदार आणि अर्चना कुलकर्णी यांनी केले. सुनीता सांगुळे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला माता पालक संघ, परिवहन समितीचे पदाधिकारी, सदस्य, शिक्षक, पालक आणि विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# धनंजय मुंडेंच्या नाथ प्रतिष्ठानमार्फत यंदा १९ व्या वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सवाचे आयोजन

**नॅशनल क्रश, पुष्पाफेम अभिनेत्री रश्मीका मंदाना व रामायणातील सिता, अभिनेत्री क्रिती सनॉन गणेश महोत्सवाच्या उद्घाटन समारंभास आज परळीत येणार**

**कैलाश खेर, अभिलिप्सा पांडा, हेमा मालिनी, अजय-अतुल, आनंद शिंदे यांसह हिंदी-मराठी सिनेसृष्टीतील कलाकारांच्या उपस्थितीत परळीवासीयांसाठी दहा दिवसांची सांस्कृतिक मेजवानी**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.६ सप्टेंबर**

राज्याचे कृषिमंत्री, बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेचे अध्यक्ष धनंजय मुंडे यांच्या नाथ प्रतिष्ठानच्या मार्फत दरवर्षी साजरा केला जाणारा व महाराष्ट्रभर ख्याती असलेला श्री वैद्यनाथ सार्वजनिक गणेश महोत्सव यावर्षी १९ व्या वर्षात पदार्पण करत असून यावर्षी देखील श्री गणेश महोत्सवाचे परळी शहरात आजपासून दिमाखदार आयोजन करण्यात येत आहे.

आज श्री गणेश चतुर्थीच्या दिवशी ना.धनंजय मुंडे यांच्या हस्ते शुभमुहूर्तावर श्रींची स्व.पंडित अण्णा मुंडे सहभागृह, जत्रा मैदान, परळी येथे विधिवत स्थापना करून या गणेश महोत्सवास सुरुवात होईल.या गणेश महोत्सवाच्या उद्घाटन कार्यक्रमास नॅशनल क्रश म्हणून ओळख असलेली पुष्पा फेम अभिनेत्री रश्मिका मंदाना तसेच रामायण चित्रपटातुन देशाच्या घराघरात पोहोचलेली सीतेचा अभिनय अत्यंत उत्कृष्टरित्या केलेली अभिनेत्री क्रिती सनोन या दोघींची प्रमुख उपस्थिती असणार आहे. तर ता उदघाटन कार्यक्रमाचे निवेदन अभिनेता संकर्षण कऱ्हाडे करणार आहे.



यावर्षीच्या गणेश महोत्सवात प्रतिवर्षी पेक्षाही उत्तम दर्जाच्या कलाकारांच्या उपस्थितीत परळी वासियांना सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी मेजवानी गणेशोत्सवाचे १० ही दिवस अनुभवायला मिळणार आहे.

असे आहेत कार्यक्रम

पहिल्या दिवशी सात सप्टेंबर शनिवारी अभिनेता संकर्षण कराडे त्याचबरोबर सिने अभिनेत्री सोनाली कुलकर्णी, तेजा देवकर, ऋतुजा जुन्नरकर, पूनम कुडाळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम तर दुसऱ्या दिवशी ८ तारखेला रविवारी सायंकाळी प्रसिद्ध गायक कैलाश खेर व गायिका अभिलिप्सा पांडा यांच्या शिव भजन गीतांचा कार्यक्रम होईल.

९ सप्टेंबर, सोमवार, अभिनेत्री अमृता खानविलकर, पूजा सावंत, समीरा गुजर, संस्कृती बालगुडे, प्रसंनजीत कोसंबी व अंशिका चोनकर यांचा महाराष्ट्राच्या तारका हा सुप्रसिद्ध संगीतमय कार्यक्रम.

१० सप्टेंबर, मंगळवार : सुप्रसिद्ध बॉलीवूड सिनेतारका, ड्रीमगर्ल, हेमामालिनी यांचा राधा कृष्ण लीला दर्शवणारी शास्त्रीय नृत्याद्वारे विशेष प्रस्तुती.

११ सप्टेंबर, बुधवार : महाराष्ट्राची संस्कृती अंतर्गत या अभिनेत्री मानसी नाईक, माधुरी पवार, मीरा जोशी, हेमलता बने, ऐश्वर्या बदडे यांचा संगीतमय कार्यक्रम.

१२ सप्टेंबर, गुरुवार : इंडियाज गॉट टॅलेंट फेम क्रेझी हॉपर्स ग्रुप आग्रा यांचा नृत्य थरार व हिंदवी पाटील व प्राजक्ता गायकवाड लावणी यांची जुगलबंदी.

१३ सप्टेंबर, शुक्रवार : चला हवा येऊ द्या सहभाग - स्मिता गोंदकर, जुई बेंडकले, हेमांगी कवी, सागर करंडे, भारत गणेशपुरे, कुशल बद्रिके, गौरव मोरे, श्रेया बुगडे व इतर

१४ सप्टेंबर, शनिवार : महाराष्ट्राची हास्य जत्रा सहभाग - समीर चौगुले, पृथ्वीक प्रताप, नम्रता संभेराव, वनिता खरात, प्रसाद खांडेकर, शिवाली परब, चेतना भट व इतर.

१५ सप्टेंबर, रविवार : अजय अतुल लाईव्ह, जगप्रसिद्ध गायक, गीतकार व संगीतकार अजय व अतुल गोगावले यांचा ५० कलाकारांच्या संचासह लाईव्ह गीतांचा कार्यक्रम.

१६ सप्टेंबर, सोमवार - प्रसिद्ध गायक आनंद शिंदे व टीमचा भीमगीतांचा खास कार्यक्रम.

दरम्यान या गणेश महोत्सवाच्या निमित्ताने धनंजय मुंडे साहेब यांच्या संकल्पनेतून परळी वासियांना तसेच बीड जिल्ह्यातील गणेश भक्तांना सांस्कृतिक कार्यक्रमांची मोठी मेजवानी अनुभवास मिळणार असून या गणेश महोत्सवात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे व कार्यक्रमांचा आनंद घ्यावा, असे आवाहन ज्येष्ठ नेते तथा नाथ प्रतिष्ठानचे कार्यवाह वाल्मीक अण्णा कराड यांनी केले आहे.

# गणेश व्याख्यानमालेचे आयोजन

## योगेश्वरी शिक्षण संस्थेचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ सप्टेंबर**

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीही ८ ते १६ सप्टेंबर या कालावधीत गणेश व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष मा.चंद्रशेखर बर्दापूरकर व सचिव कमलाकर चौसाळकर यांनी दिली.

व्याख्यानमालेत दि. ०८ सप्टेंबर रोजी पुणे येथील प्रा.डॉ.श्रीरंजन अवटे हे संविधान भान हा विषय मांडणार आहेत. ०९ सप्टेंबर रोजी पुणे येथील कर्नल. गिरीधर कोले हे कारगिल युद्धातील स्वानुभव या विषयी भाष्य करणार असून, १० सप्टेंबर रोजी पुणे येथील डॉ. नितीन हंडे हे आपले भवताल, आपले ब्रम्हांड याविषयी आपले विचार मांडतील. १२ सप्टेंबर रोजी जळगाव येथील प्रा.अश्विन झाला हे अध्यात्म आणि विज्ञान या विषयी बोलणार आहेत,१३ सप्टेंबर रोजी, लातूर येथील प्राचार्य डॉ. बाबासाहेब ठोंबरे हे भारतीय कृषि व पशुपालन संस्कृती- काल आज आणि उद्या या विषयावर मनोगत व्यक्त करतील. अहमदनगर येथील डॉ. भूषण कुलकर्णी, हे १४ सप्टेंबर रोजी कृत्रिम बुद्धिमत्ता (-ींळषळलळरश्र खपींशश्रश्रळसशपलश) याविषयी तर,१५ सप्टेंबर रोजी डॉ.नागेश टेकाळे, मुंबई हे निसर्ग संवर्धनामध्ये लोकसहभागाचे महत्व या विषयावर मनोगत व्यक्त करतील. प्रा.डॉ. वसंत गिरी,बुलढाणा हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सशस्त्र क्रांतीकारकांचे योगदान या विषयाने व्याख्यानमालेचा समारोप करतील.

योगेश्वरी महाविद्यालयतील नागापुरकर सभागृहात सायं ६.३० वा.होणाऱ्या व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन समन्वयक प्रा.डॉ.गणेश पिंगळे,प्राचार्य रमण देशपांडे,प्रा.डॉ.शैलजा बरुरे ,संयोजक मुख्याध्यापक के.बी.नांदगावकर, संस्था संचालक तसेच गणेशोत्सव समितीच्या सदस्यांनी आदींनी केले आहे.

# लाचखोरीत महिलाही मागे नाहीत

## पुनम आमटे यांना एसीबीने रंगेहात पकडले

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.६ सप्टेंबर**

बीड जिल्ह्यात मागील काही दिवसापासून लाचखोरी चे प्रमाण वाढले असून,बऱ्याच शासकीय कार्यालयात पैसे दिल्याशिवाय कर्मचारी अधिकारी कामच करत नाहीत.मागील दोन महिन्यात लाच दूध संपत प्रतिबंधक विभागाने लाचखोरावर अनेक कारवाया करून देखील लाच खाण्याचे प्रमाण काही कमी होताना दिसत नाही.आज दिनाक ६ सप्टेंबर रोजी बीड शहरातील अंकुश नगर परिसरात असलेले ३३/११ उपकेंद्र या ठिकाणी संबंधित तक्रारदाराच्या घरी विद्युत चोरीची तक्रार दाखल न करण्यासाठी संबंधित विद्युत सहाय्यक यांनी तक्रारदाराकडून २० हजाराची लाच मागितली होती. तडजोडी अंती १६ हजाराची लाच घेताना आज दुपार दुपारी विद्युत सहाय्यक श्रीमती पुनम आमटे यांना एसीबीने रंगेहात पकडले. त्यांच्या विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.बीड जिल्ह्यामध्ये लाच घेण्याचे प्रकार दिवसेंदिवस वाढतच आहेत. महसूल विभाग, जिल्हा परिषद विभाग, नगर पालिका,पंचायत समिती, पोलीस विभाग यासह इतर विभागांमध्ये या लाचेच्या घटना मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. त्यातच आता महावितरण विभागसुद्धा मागे नसल्याचे दिसत आहे.लाच मागण्यात महिला देखील मागे राहिल्या नसल्याचे या कारवाईवरून स्पष्ट झाले आहे.

बीड जिल्ह्यात लाचखोरांवर अश्याच कारवाई होत राहिल्या तर लाचखोराचां जिल्हा म्हणून बीड ची ओळख होईलसंदीप आटोळे, पोलीस अधीक्षक, मुकुंद आघाव अपर पोलिस अधीक्षक,पोलीस उपअधिक्षक शंकर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी - पोलीस - निरीक्षक किरण बगाटे, सापळा पथक भरत गारदे, अमोल खरसाडे, सुरेश सांगळे, हनुमान गोरे, संतोष राठोड, अविनाश गवळी, स्नेहलकुमार कोरडे, अंबादास पुरी, गणेश मेहेत्रे यांनी केली. शासकीय कामात कुठे अडथळा निर्माण होत असेल व कोणते अधिकारी लाचेची मागणी करत असतील तर संबंधित तक्रारदाराने बीड एसीबीसी संपर्क साधावा असे आव्हान पोलीस उपअधीक्षक शंकर शिंदे यांनी केले आहे. मागील काही महिन्यांपासून एसिबीच्या कारवायात वाढ झाल्याने लाचखोरांचे धाबे दणाणले आहेत.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयात महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.६ सप्टेंबर**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित व मार्शल आर्ट यांच्या संयुक्त विद्यमाने सुंदरराव सोळंके जयंतीनिमित्त सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सात दिवसीय महिला स्वसंरक्षण प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. या शिबिराचे प्रशिक्षण प्रशिक्षक म्हणून चंद्रमणी डोंगरे, कुशल डोंगरे, प्रीती प्रधान यांनी यांनी प्रशिक्षण दिले.

विद्यार्थिनींना स्वसंरक्षणासाठी मार्शल आर्ट कराटेचे प्रशिक्षण या सात दिवशीय शिबिरात देण्यात आले. शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य यांचे डॉ.एन. के. मुळे, प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य डॉ. एम.ए .कव्हळे, उपप्राचार्य पी. व्ही. गवते,उपप्राचार्य पी. एस.शिंदे, प्रा.महादेव आलझेंडे, महिला कक्ष प्रमुख अर्चना कचरे, प्रशिक्षक चंद्रमुनी डोंगरे, प्रा उज्वला कदम, प्रा.एन. वडमारे यांच्यासह प्राध्यापक प्राध्यापिका कर्मचारी विद्यार्थ्यांनी उपस्थित होते

# अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करुन आर्थिक मदत द्यावी-आप्पाराव यादव

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.६ सप्टेंबर**



सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत जाहीर करण्यात यावी अशी मागणी भारतीय किसान संघाचे बीड जिल्हा मंत्री अप्पाराव यादव यांनी उपजिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात पुढे म्हटले आहे की, सप्टेंबर महिन्यात सतत मुसळधार पाऊस कोसळत असून काही भागात ढगफुटी झाली आहे. यामुळे शेत शिवारात काढणीस आलेले मूग उडीद मटकी कडधान्ये यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच सोयाबीन कापूस तूर मोसंबी मका यासारख्या भाजीपाला फळबागा असणाऱ्या भागातील शेतात फूटभर पाणी साचलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातचे पीक गेलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक नुकसान झालेले आहे. दरम्यान शेतकऱ्यांनी पिक विमा उतरवला आहे मात्र विमा कंपनीचे प्रतिनिधी वेळेवर पंचनामा करण्यास येत नाहीत तसेच ऑनलाइन तक्रार नोंदविण्याची माहिती गोरगरीब शेतकऱ्यांना नसल्यामुळे ते तक्रार करू शकत नाहीत. विमा कंपन्या तांत्रिक मुद्द्यांवर बोट ठेवून नुकसान भरपाई देण्याच्या जबाबदारीपासून पळ काढतात. त्यामुळे सरकारने अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानाचे पंचनामे तात्काळ करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व विमा कंपन्यांना विमा देण्यासंदर्भात आदेशित करावे या प्रक्रियेत कुणीही शेतकरी तांत्रिक कारणामुळे वंचित राहू नये याची दक्षता घ्यावी.

दरम्यान नजीकच्या काळात येणारे गणेशोत्सव दसरा दिवाळी या काळातील सण कसे साजरे करायचे व घेतलेल्या कर्जाऊ गुंतवणुकीची परतफेड कशी करावी असा प्रश्न निर्माण झाला आहे.

सोयाबीनला ६९४५ रुपये प्रतिक्किंटल हमीभाव मिळावा

या निवेदनात पुढे म्हटले आहे की महाराष्ट्रातील सोयाबीनचे पीक हे क्रमांक दोनचे महत्त्वाचे पीक आहे राज्यातील सुमारे ५० लाख हेक्टर क्षेत्र या पिकाखाली आहे. राज्याची सरासरी उत्पादकता हेक्टरी १४.५६ आहे .राज्याचा सरासरी उत्पादन खर्च ६०३९ रुपये क्किंटल आहे. राज्य सरकारने कृषी लागत एवं मूल्य आयोगाकडे प्रतिक्किंटल ६९४५ रुपये दर दिला जावा अशी शिफारस केली आहे त्याप्रमाणेच सरकारने शेतकऱ्यांना हमीभाव द्यावा. शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चावर लाभकारी किंमत मिळत नसेल तर राज्य सरकारने भावांतर पद्धतीने किंवा बोनसच्या माध्यमातून फरक देण्याची व्यवस्था करावी. निसर्गाच्या प्रकोपाने अतिवृष्टीमुळे कीड रोगाच्या कारणामुळे सरासरी उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळे सरकारने उत्पादन खर्चावर आधारित लाभकारी किंमत व घामाचे दाम अन्नदात्याला मिळवून द्यावेत.लाडक्या बहिणीं प्रमाणे लाडक्या शेतकरी दादाला लाभ मिळवून द्यावेत अशी मागणी एका निवेदनाद्वारे उप जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. याप्रसंगी भारतीय किसान संघाचे जिल्हा मंत्री आप्पाराव तुकाराम यादव, कोषाध्यक्ष भीमराव शिंदे,डव्होकेट दिलीपराव करपे, मनोज चंद्रकांत बरुरे, परमेश्वर बाबुराव राठोड, सह किसान संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.




# गौरी, गणपतीच्या आगमनानिमित्त खरेदीसाठी नागरिकांची गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ सप्टेंबर**

आजपासून श्री गणेशोत्सवाला सुरूवात होणार असून दि १० सप्टेंबर रोजी गौरीचे आगमन होणार आहे. यानिमित्त शुक्रवारी हिंगोली बाजारपेठेत पूजेच्या साहीत्यासह सुंदर, आकर्षक गणपतीच्या मूर्ती तसेच गौरीचे मुखवटे, सजावटीचे साहीत्य विक्रीसाठी आले आहे. आज गणरायाचे आगमन होणार असल्यामुळे नागरिकांनी खरेदीसाठी बाजारपेठेत मोठी गर्दी केली होती.

आजपासून श्री गणरायाचे आगमन होणार असून यानिमित्त बाजारपेठेत गणपतीच्या सुंदर आणि आकर्षक मुर्ती विक्रीसाठी आल्या आहेत. विविध गणेश मंडळे तसेच घर-घरी गणपती बसविण्यासाठी नागरिकांनी खरेदीसाठी मोठी गर्दी केली होती. यावर्षी गणपतीची किंमत जास्त असूनही नागरिकांचा उत्साह मात्र कमी झाला नसल्याचे दिसत आहे. तसेच गणपतीसाठी विविध प्रकारचे मखर तसेच सजावटीसाठी इलेक्ट्रीक साहीत्य, विविध प्रकारच्या माळा, आकर्षक फुलांच्या माळा तसेच केळीचे खांब, झेंडूची फुले खरेदी करण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. प्रसादासाठी मिठाईची दुकाने सजली असून गुळ, फुटाणे आदींची छोटी-छोटी दुकानेही बाजारपेठेत थाटली आहेत.



दि १० सप्टेंबरपासून गौरीचे आगमन होणार असल्यामुळे बाजारपेठेत सुंदर आणि आकर्षक असे महालक्ष्मीच मुखवटे, हात तसेच कोथळ्या विक्रीसाठी आल्या आहेत. शहरासह ग्रामीण भागातील नागरिकांनी या दुकानात खरेदीसाठी गर्दी केल्याचे पहायला मिळाले. गौरीसमोर सजावटीसाठी लाईटींग, फुलांच्या माळा तसेच विविध आकाराची आणि आकर्षक असे मखर तसेच पडदे खरेदी करण्यासाठी नागरिक गर्दी करीत असतांना दिसत आहे.

मागील दोन दिवसांपासून अचानक संध्याकाळी पाऊस येत असल्यामुळे शहरातील गांधी चौकात फुटकळ व्यापाऱ्यांची तारांबळ उडतांनाही दिसत आहे. गणपती आणि गौरीच्या आगमानिमित्त हिंगोलीतील बाजारपेठा सजल्या असून मोठ्या संख्येने नागरिक खरेदी साठी येत आहेत. सर्वत्र उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण दिसत आहे. गणेश मंडळांनीही जोरदार तयारी केल्याचे दिसत आहे.

# ॲट्रासिटी कायद्याखाली दाखल गुन्ह्यात फाशीच्या शिक्षेची तरतूद करा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ सप्टेंबर**

वसमत तालुक्यातील आडगाव रंजे येथील तलाठी संतोष पवार यांच्या खून प्रकरणी हिंगोली येथे १० सप्टेंबर २०२४ रोजी जिल्हास्तरीय निषेध मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्त आज हिंगोली येथे शासकीय विश्रामगृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना ड. रावण धाबे यांनी अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याखाली दाखल झालेल्या खुनाच्या प्रत्येक गुन्ह्यात आरोपींना थेट फाशीची शिक्षा देण्याची या कायद्यामध्ये तरतूद करण्याची मागणी करण्यात आली.

बीएनएस आणि अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याखाली दाखल झालेल्या खुनाच्या अत्यंत दुर्मिळातील दुर्मिळ प्रकरणात फाशीची शिक्षा दिली जाते. परंतु अनुसूचित जाती जमाती कायद्याखाली दाखल झालेल्या गुन्ह्यात आरोपी हे संबंधित पीडित व्यक्तीला, मयताला केवळ आणि केवळ तो खालच्या जातीचा आहे, दुर्बल घटकातील आहे या भावनेतूनच त्याचा खून केला जातो. त्यामुळे या समाजाच्या मनामध्ये सुरक्षितता निर्माण होण्यासाठी आणि कायद्याचा वचक निर्माण होण्यासाठी या कायद्याखाली दाखल झालेल्या खुनाच्या गुन्ह्यात मग तो खून निर्घृण असो की नसो आरोपींना सरळ फाशीची शिक्षा झाली पाहिजे, अशी मागणी यावेळी ड. रावण धाबे यांच्या वतीने करण्यात आली. यावेळी पत्रकार परिषदेला उपस्थित ज्येष्ठ नेते मधुकर मांजरमकर यांनी सांगितले की, आडगाव रंजे या गावात नामांतर चळवळीमध्ये जातीवादाचा पहिला गुन्हा दाखल झाला होता अशी माहिती दिली. त्यामुळे हे गाव जातीयवादी आहे आणि त्यामुळेच खुनाच्या वेळी कुणीही मदतीला आले नसल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी १० सप्टेंबर २०२४ रोजी हिंगोलीत काढण्यात येणाऱ्या निषेध मोर्चाबद्दल उपस्थित सामाजिक नेत्यांनी सविस्तर माहिती दिली. तसेच मोर्चातील मागण्या संदर्भात सुद्धा माहिती दिली. पत्रकार परिषदेला दीपक सोनवणे, प्रशांत बोडके, राजू इंगोले, बंडू नरवाडे, प्रकाश इंगोले आदी उपस्थित होते.

# दोन अल्पवयीन मुलींचा विनयभंग, आरोपीला पोलिसांनी केली अटक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ सप्टेंबर**

हट्टा पोलिस ठाण्यांतर्गत एका गावात दुकानदाराने दोन अल्पवयीन मुलींचा विनयभंग केल्याची घटना घडली असून याप्रकरणी दि ५ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल केल्यानंतर पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हट्टा पोलिस ठाण्यांतर्गत एका गावातील दोन अल्पवयीन मुली गुरूवारी दुपारच्या सुमारास गावातील एका दुकानावर पेन खरेदी करण्यासाठी गेल्या होत्या. दुपारच्यावेळी गावात शुकशुकाट असल्याचा गैरफायदा घेत दुकानदार बबन जाधव वय ५१ याने त्या मुलींना घरात बोलावले. त्यानंतर त्यांना गोडीगुलाबीने बोलून त्या मुलींचा विनयभंग केला. दरम्यान, गावातील दुकानावर पेन खरेदीसाठी गेलेल्या मुलीस घरी परत येण्यासाठी उशीर का लागत आहे. यासाठी एका मुलीची आजी त्यांना पाहण्यासाठी जात असतांनाच मुली परत येत असतांना दिसल्या. यावेळी त्यांच्या आजीने पेन घेण्यासाठी एवढा वेळ का लागला अशी विचारणा केली असता दोन्ही मुलींनी घडला प्रकार आजीला सांगितला. त्यानंतर हा प्रकार दोन्ही मुलींच्या कुटुंबियांना समजल्यानंतर त्यांनी रात्री थेट हट्टा पोलिस ठाणे गाठून रितसर तक्रार दाखल केली.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन हट्टा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक संग्राम जाधव, उपनिरीक्षक एस जी केंद्रे यांनी दुकानदार बबन जाधव याच्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे. त्यानंतर त्याच्या अटकेसाठी तातडीने पथके रवाना केली. पोलिसांच्या पथकाने रात्रीच त्यास अटक केली आहे. पुढील तपास उपनिरीक्षक केंद्रे हे करीत आहेत.

जिल्ह्यात अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरूध्द पोलिस विभागाच्यावतीने विविध पोलिस ठाण्यांतर्गत कार्यवाही करण्यात आली. १८ वाहनचालकांविरूध्द कार्यवाही करीत त्यांचेकडून १२ हजार ३८ रूपये दंड वसुल केला आहे.

# माजी आ. गजानन घुगे यांनी केली कळमनुरी तालुक्यात नुकसानग्रस्त भागाची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ सप्टेंबर**

कळमनुरी तालुक्यातील अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांची पाहणी माजी आ. गजाननराव घुगे यांनी दि ५ सप्टेंबर रोजी पाहणी करीत गावकऱ्यांशी संवाद साधला.



अतिवृष्टीमुळे कापुस, सोयाबिन, हळद या पिकांचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यावेळी भाजपा प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी आमदार गजाननराव घुगे यांनी मतदासंघातील सोडेगाव, सांडस, सालेगाव या गावांना भेटी देत तेथील ग्रामस्थांशी चर्चा केली. अडीअडचणी जाणुन घेतल्या व लवकरात लवकर जिल्हा कृषी अधिकारी व तालुका कृषी अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याशी संवाद साधत तात्काळ पंचनामे करून योग्य ती आर्थिक नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली. यावेळी माजी घुगे यांनी त्यांचा वाढदिवस अतिशय साध्या पध्दतीने साजरा करण्याचे आवाहन केले.

## संक्षिप्त वृत्त

### जवळाबाजारमध्ये दोन गटात हाणामारी

औंढा नागनाथ- तालुक्यातील जवळा बाजार येथे दोन गटांमध्ये तुफान हाणामारी झाली. येथील परभणी रस्त्यावर असलेल्या एका जागेवरून दोन गटात हाणामारी झाली. माहीती मिळताच पोलीस उपनिरीक्षक माधव जीवारे, जमादार इम्रान सिद्दिकी शेख यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली दरम्यान सदर घटनेची माहिती औंढां पोलीस स्टेशनला देण्यात आली होती. पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, उपनिरीक्षक किशोर पोटे यांनी पोलीस पाटील घटनास्थळी गाव घेऊन सदर घटना नियंत्रणात आणली. या घटनेतील जखमींना परभणी हिंगोली येथील दवाखान्यामध्ये भरती केले होते दरम्यान सदर घटनेबाबत दोन्ही पक्षांकडून परस्परविरोधात गुन्हा दाखल केला ज्यामध्ये एका गटाकडून गणेश सुरेश माने याने फिर्याद दाखल केली असून शेख अन्सार शेख रौफ ,शेख अनिस शेख रौफ, शेख निसार शेख अमिर, शेख मेहबूब शेख निसार, शेख अयुब शेखरौफ सर्व राहणार जवळा बाजार यांच्यावर गुन्हा नोंद केला तर दुसरीकडून शेख निसार शेख अमीर यांनीही फिर्याद दाखल करून आरोपी दीपक शंकर माने, सुरेश शंकर माने, गोपाळ माने, गणेश माने सर्व राहणार जवळा बाजार गणेश कीर्तने राहणार आसोला यांच्या विरोधात फिर्याद दिली आहे. घटनास्थळी अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती अर्चना पाटील व वसमतचे उपविभागीय पोलीस अधिकारी मारुती थोरात यांनीही भेट दिली आहे.

### गणेशोत्सव काळात अखंड सुविधा देण्याची मागणी

औंढा नागनाथ- श्री गणेश चतुर्थी हे मराठी भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्ष चतुर्थीला केले जाणारे एक धार्मिक व्रत आहे. गणेश चतुर्थी या दिवसाला महासिद्धीविनायकी चतुर्थी किंवा शिवा असेही म्हणले जाते. या चतुर्थीला हिंदू धर्मात विशेष महत्त्व आणि स्थान आहे. असे मानले जाते की, गणेशाला प्रसन्न केल्याने घरात सुख समृद्धी आणि शांती प्रस्थापित होते. श्री गणेश यांच्या दहा दिवसीय उत्सवात सकाळ, संध्याकाळ किमान आरतीच्या वेळी विदयुत पुरवठा खंडीत होणार नाही याची विशेष खबरदारी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ प्रशासनाने काळजी घ्यावी. तर नगर पंचायत प्रशासनानी सर्वत्र स्वच्छता राहील या करिता यंत्रना सज्ज ठेवून सर्वत्र स्वच्छते बाबत प्रबोधन करावे .शहराच्या प्रमुख रस्त्यावर पाणी साचु नये या करिता वाहुण गेलेल्या रोड वरील खड्डे बुजवावेत. उत्सवा प्रसंगी महीला ,मुलींच्या संरक्षणाबाबत दामीनीपथक सक्रीय करावेत. अशा मागण्या नागरीक करत आहेत प्रशासनाने दखल घ्यावी. गणपती उत्सव निमित्त सुविधा देण्यात यावे औंढां शहरात सध्या गणपती उत्सव सुरू होणार आहे या निमित्ताने दहा दिवस आरतीच्या वेळेस सहकारी संध्याकाळ लाईट ची व्यवस्था देण्यात यावी व लाईट जाऊ नये याची दक्षता घ्यावी औंढा शहरातील सर्व धार्मिक स्थळांची स्वच्छता करून घेण्यात यावी वसमत शहरातील सर्व नाली खड्डे बुजविण्यात यावे नाली स्वच्छ करून घेण्यात यावी नालीच्या आजूबाजूला डस्ट पावडर टाकून स्वच्छ करण्यात यावे या सर्व सुविधा देण्यात यावी अशी मागणी सर्व औंढां शहरातील गणेश भक्ताकडून करण्यात येत आहे.

# संत चक्रधर स्वामी यांची जयंती साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली ६ सप्टेंबर**

महान संत आणि महानुभाव पंथाचे संस्थापक संत चक्रधर स्वामी यांची जयंती येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आज साजरी करण्यात आली. यावेळी उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड यांनी संत चक्रधर स्वामी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी पंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी संजय कुलकर्णी, महसूल विभागाचे तहसीलदार आश्विनकुमार माने, नायब तहसीलदार डी. एस. जोशी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# पवार पब्लीक स्कूलमध्ये शिक्षक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ सप्टेंबर**

येथील पवार पब्लिक स्कूल येथे शिक्षक दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त पूजन करण्यात आले.

याप्रसंगी विविध वर्गातील विविध मुली - मुलांनी आपापल्या वर्ग शिक्षकांचा अभिनय सादर केला. त्याच बरोबर काही विद्यार्थ्यांना एक दिवसासाठी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षिका, लिपिक व इतर पदे देण्यात आली. जेणे विद्यार्थ्यांना शालेय पदे व तेथील कार्य कशा प्रकारे पार पाडतात, हे कळावे व यातून एक पिढी शिक्षक गटाकडे प्रेरित होईल.



या कार्यक्रमात वर्ग दहावी मधून भारती पंजरकर यांनी मुख्याध्यापकाची भूमिका बजावली व वर्ग नववी मधून सर्वोदया ढाले यांनी उप मुख्याध्यापक यांची भूमिका बजावली, तसेच तसेच लायबा फतेमा, फरिहा फातेमा, धनश्री शिंगारे, नीतू शर्मा, सायली खिराडे, श्रेया खिलारे, दीक्षित राजपुरोहित, रोमान अली, धनश्री सावळे, अक्षरा जाधव, आदित्य पवार, युवराज माळोदे, युवराज दळवी, सोमेश राख, अंशिरा शेख, झियान शेख, पूर्वी चांदेकर, आयेशा शेख, सचिन वाकडे, उत्तरा खंदारे, शौर्या ढाले, उम्मे अनम, अब्दुल इमाज, नुबेद शेख इत्यादींनी शिक्षक - शिक्षिका व इतर पदे बजावली.

याप्रसंगी उपस्थित पवार पब्लिक स्कूलचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक प्रणव शिवाजीराव पवार, कोमल अग्रवाल, गजानन वानरे, योगेश थोरात, दिपाली राऊत, चेताली बीचेवार, अश्विनी बोराळकर, रसिका विडोळकर, सय्यद फिजा, मनीषा खानापूरकर, विष्णू घुगे, जोबिन जॉर्ज, ज्ञानेश्वर रांजने, स्वाती कल्याणकर, छाया धनवे इत्यादी शिक्षक व शिक्षोत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# जिल्हाभरात वसमत येथील मराठा आंदोलकांना मारहाणीचा निषेध

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ६ सप्टेंबर**

वसमत येथे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सभेत मराठा आंदोलकांना संविधानिक पद्धतीने मागण्या करित असतांना पोलिसांनी धक्काबुकी करुन आंदोलकांना जखमी केले. या घटनेचा जिल्हाभरात निषेध करण्यात आला. आंदोलकांवर दाखल करण्यात आलेले खोटे गुन्हे त्वरित मागे घेण्यात यावेत अशी मागणी वसमत, सेनगांव व औंढा नागनाथ येथे तहसीलदारांना निवेदन देऊन करण्यात आली आहे.



सकल मराठा समाजाच्या वतीने मंगळवार दि.३ सप्टेंबर रोजी वसमत, औंढा नागनाथ व सेनगाव येथील सकल मराठा समाजाच्या बांधवांनी तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व ठाणेदार यांना निवेदन देऊन मारहाणीचा निषेध केला. दि.२८ ऑगस्ट रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार हे हिंगोली जिल्हा दौर्यावर आले असतांना वसमत येथील सभेत मराठा समाजाच्या वतीने मराठा आरक्षण संबंधाने शांततेत व संविधानिक पद्धतीने आंदोलक निवेदन देण्यासाठी गेले असतांना त्यांना पोलिस अंगरक्षक व इतर पोलिस अधिकारी, कर्मचारी यांनी अमानुष व हिनतेची वागणुक देवून मारहाण केली. या मारहाणीत जखमीं झालेल्या आंदोलकांना रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले होते. त्याच बरोबर अमानुष मारहाण करुन मराठा आंदोलकावर खोटे गुन्हे पोलिसांनी दाखल केले आहेत. मराठा सेवकांना वसमत येथील सभास्थळी मराठा आरक्षणाच्या मागणीवर अजित पवार यांनी बोलण्याचे टाळले. या अमानुष मारहाणीचा सकल मराठा समाजाच्या वतीने तिव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. या मारहाण प्रकरणातील पोलिस अधिकारी व कर्मचार्यांवर कार्यवाही करण्यात यावी. हे खोटे गुन्हे तात्काळ मागे घेण्यात यावेत अन्यथा सकल मराठा समाजाच्या वतीने तिव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराही सकल मराठा समाजाच्या वतीने दिलेल्या निवेदनात देण्यात आला आहे. यावेळी मराठा सेवक मोठया संख्येने उपस्थित होते. दरम्यान, वसमत येथे उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले असुन या निवेदनात वसमत तालुका सकल मराठा समाजाच्या वतीने चार मागण्या केल्या आहेत. यामध्ये कलम १२३ चुकीच्या पद्धतीने मराठा आंदोलकावर लावण्यात आली आहे. तसा कुठलाही गुन्हा करण्यात आलेला नाही. यामुळे आंदोलकांची नाहक बदनामी होत आहे. त्याबाबत स्पष्टीकरण व दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी, आंदोलकांनी बळाचा वापर किंवा आरेरावी केल्याचे दिसुन येत नाही. उलट पक्षी काही पोलिस कर्मचारी, सुरुक्षा कर्मचारी आणि काहि राजकीय पक्षाचे कार्यकर्ते यांनी आरेरावी, मारहाण करुन आंदोलकांना जमीनवर फेकल्याचे स्पष्ट दिसुन येत आहे. तेव्हा सदरील वेगवेगळया व्हिडीओमध्ये दिसुन येणार्या आणि मारहाण करणार्या व्यक्तीवर गुन्हे दाखल करण्यात यावेत. दाखल झालेल्या गुन्हयामध्ये मराठा आंदोलकांना नजरकैद किंवा सभास्थळी येण्याचा मजाव करण्यात आला होता. लेखी निवेदन देणारे निवेदनकर्ते यांना यंत्रणेने आश्वासित करुन सभास्थळी पोहविण्यात आले. परंतु तेथे मात्र आंदोलकांना जाण्यापासुन मजाव, धक्काबुकी, मारहाण करुन उपमानीत करण्यात आले. केवळ निवेदनावर स्वाक्षरी केलेल्या लोकांवर कुठलाही तपास न करता गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या सर्व गंभीर विषयावर तिन दिवसात कार्यवाही झाली नाही तर तिव्र आंदोलन करण्याचा इशारा सकल मराठा समाज वसमत यांच्या वतीने देण्यात आला आहे.

# दहीहंडी कार्यक्रमात नाचण्याच्या कारणावरुन एकाचा खून

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ०६ सप्टेंबर-**

दहीहंडीच्या कार्यक्रमात झालेला वाद मिटविण्याचा प्रयत्न सुरु असतानाच पुन्हा वाद होवून एकाचा चाकुने भोसकुन खून झाल्याची घटना आज दि.६ सप्टेंबर रोजी शहरातील राज कॉर्नर परिसरात घडली. या घटनेत एकाचा मृत्यू तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

शहरातील चैतन्यनगर येथे दि.५ सप्टेंबर रोजी शिवसेनेच्या वतीने दहीहंडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास सुप्रसिध्द अभिनेत्री माधुरी पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. या दहीहंडी कार्यक्रमा दरम्यान सहयोगनगर येथील अंकुश प्रकाश इंगोले व तरोडा बु. येथील कृष्णा धोंडीबा मुळे यांच्यात नाचण्यावरुन वाद झाला. हा वाद मिटविण्यासाठी आज दि.६ सप्टेंबर रोजी राज कॉर्नर येथील योगेश चौधरी, अंकुश इंगोले यांच्याकडे धोंडीबा मुळे यांना घेवून माफी मागण्यासाठी आले होते. दरम्यान हा वाद मिटविण्याचा प्रयत्न सुरु असताना कृष्णा धोंडीबा मुळे, वैभव दत्तराम दुधाटे यांनी प्रकाश इंगोले यास मारहाण करण्यास सुरुवात केल्याने हा प्रकार पाहताच अंकुश इंगोले याने हॉटेलमधील चाकू घेवून कृष्णा मुळे व वैभव दुधाटे यांच्यावर वार केले. यात वैभव दुधाटे हा मयत झाला. तर कृष्णा मुळे गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरु आहेत. या प्रकरणातील आरोपी अंकुश इंगोले यास भाग्यनगर पोलिसांनी अटक केली असून, त्याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.

# गणेश उत्सव आणि ईद ए मिलाद शांततेत साजरे करा : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०६ सप्टेंबर-**

गणेश उत्सव आणि ईद- ए -मिलाद हे दोन्ही सण यावर्षी एकाच कालावधीत आले आहेत. जिल्ह्यात हे दोन्ही सण साजरे करतांना सर्व धर्मीयांनी परस्पर सौहार्द व शांततेला गालबोट लागणार नाही याची काळजी घेऊन एकोप्याने व आनंदाने सण साजरे करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन भवन येथे आज शांतता समितीच्या बैठक आयोजित केली होती. यावेळी ते बोलत होते.यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव, तसेच विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी यासह शांतता समितीचे सदस्य व इतर सदस्यांची उपस्थिती होती.

**सोशल मिडियाच्या अफवांना दुर्लक्ष करा**

जिल्ह्यात गणेश उत्सव व ईद ए मिलाद या सणाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सोशल माध्यमावरील संदेशामुळे जिल्ह्यात शांततेचा भंग होणार नाही याची काळजी सर्वांनी घ्यावी. याबाबत अगोदर सोशल माध्यमावरील संदेशाची सत्यता तपासून मगच प्रतिक्रिया द्यावी. कायदा व सुव्यवस्थेचा भंग होणार नाही याची दक्षता प्रत्येक नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले. कोणत्यातरी वर्षा मधल्या कुठल्यातरी व्हिडिओमुळे संदेशामुळे किंवा पोस्टमुळे आपल्या आजूबाजूंच्या लोकांमध्ये अफवांचा बाजार पसरणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याचे ही आवाहन त्यांनी केले. तसेच गणेश मंडळानी परवानगी घेवूनच गणेश मुर्तीची स्थापना करावी अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावर्षी दोन्ही धर्मीयाचे सण एकत्र आले आहेत. दोन समाजाने या कालावधीत शांतता व संयम पाळून सण साजरे करावेत. गणपती मंडळानी समाजात तेढ निर्माण होणार नाहीत याची काळजी घेवून देखावे करावेत. तसेच ध्वनी प्रदुषणमुक्त गणेश उत्सव साजरा करण्यावर भर द्यावा ,असे पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी सांगितले. नागरिकांनी स्वत: होवून नियम पाळले तर शांततेचा भंग होणार नाही. प्रत्येकाने आपआपली जबाबदारी ओळखून सण आनंदाने साजरे करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त



### उमरी परी हॉस्पीटला भास्करराव खतगावकरांची भेट

**उमरी** -माजी मंत्री तथा माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर, माजी आमदार ओमप्रकाश पोकर्णा आणि माजी खासदार भास्करराव पाटील खतगावकर यांच्या स्नुषा सौ.मीनलताई खतगावकर यांनी परी हॉस्पिटलला सदिच्छा भेट दिली. यावेळी उमरी शहरातील अनेक मान्यवर उपस्थित होते.यावेळी डॉ. माधव विभुते गोरठेकर यांनी सौ. मीनलताई यांना परी हॉस्पिटलच्या सर्व विभागाची आणि कामकाजाची ओळख करून दिली.सौ. मीनलताई यांना वैद्यकीय क्षेत्राशी मोठी आस्था असल्याचे दिसून आले.डॉ. माधव विभुते करत असलेले सेवाकार्य पाहून सौ.मीनलताईंना खूप आनंद झाला. अशी सेवाभावी माणसं समाजात मिळत नसल्याची खंतही सौ. मीनलताईंनी व्यक्त केली. डॉ. माधव विभुते यांनी मान्यवरांचा यथोचित सत्कार केला. तद्नंतर सौ. मीनलताई खतगावकर यांनी डॉ. माधव विभुते यांच्या मातोश्री श्रीमती अनुसयाबाई विभुते यांची भेट घेतली. यावेळी छान गप्पाही झाल्या.डॉ. माधव विभुते यांच्या आईने आपल्या कष्टमय जीवनाचा जणू धावता आढावाच सौ.मीनलताई यांच्या पुढे मांडला . आईचे कष्ट पाहून क्षणभर मीनलताई आवकच झाल्या. आईनी सौ. मीनलताईना पुढील वाटचालीसाठी भरभरून आशीर्वाद देत पाठवणी केली.यावेळी वेदांग मेडिकल चे संचालक तानाजी पाटील आनेराये शेळगावकर,अनुश्री प्रयोगशाळेचे संचालक राजेश विभुते गोरठेकर इत्यादी उपस्थित होते.

### ओबीसी गुणवंत विद्यार्थ्यांचा उद्या सत्कार

**नांदेड** -अखिल भारतीय पिछडा शोषित संघटना नांदेडच्या वतीने मागील पंधरा वर्षांपासून ओबीसी, व्हीजेएनटी, एनटी, एसबीसी या प्रवर्गातील इयता दहावी, बारावी उत्तीर्ण व अभियांत्रीकी तसेच वैद्यकीय शिक्षणास प्रवेश घेतलेल्या गुणवंत विद्यार्थी व पालकांचा यथोचित सत्कार संघटनेच्या वतीने करण्यात येतो. यावर्षीदेखील गुणवंत विद्यार्थी सत्कार व ओबीसी चळवळीत काम करणाऱ्या नेत्यांना ओबीसी भूषण पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मणराव क्षीरसागर राहणार असून माजी जि.प. अध्यक्ष संभाजीराव धुळगुडे, प्रसिद्ध उद्योजक बालाजीराव इबितदार, सेवानिवृत्त अधीक्षक अभियंता संजयकुमार अवस्थी, शंकर वानेगावकर, गोविंद दळवी, प्रा. साईनाथ शेटोड यांच्या हस्ते वितरण होणार असून बीपीएसएसचे राष्ट्रीय अध्यक्ष एस.जी. माचनवार, नामदेव आयलवाड, अविनाश भोसीकर यांची उपस्थिती लाभणार आहे. सदरील कार्यक्रम रविवार, ८ सप्टेबर रोजी दुपारी १२ वाजता हॉटेल विसावा, नाना-नानी पार्कजवळ, शिवाजीनगर, नादेड येथे होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष सतीशचंद्र शिंदे, राजेश चिटकुलवार, रवींद्र बंडेवार, ओमेश पांचाळ, मुंजाजी काकांडीकर, प्रा. दिलीप काठोडे, बालाजी कोंडलवाडे, ॲड. प्रदीप राठोड, बाळू राऊत, रामदास केंद्रे, प्रा. लक्ष्मण कोंडावार, व्ही.जे. जाधव, रमेश माळगे, पांडुरंग कोकुलवार, बाबुराव कापसे, व्ही.एन. वंगावार, सदाशिव यनवळ, बी.के. पाटील, प्रकाश कदम, विवेक चिंचलवाड, वामन पेनुरकर, संजय आलेवाड, संजय पांचाळ, गंगाधर नंदेवाड, रामदास आलकटवार, बाबाराव जरगेवाड, बाबाराव इबितदार, दत्ता चापलकर, पंडित तोटावाड, स्वप्नील रामगीरवार, वाय.जी. देवकर, सचिन रामदीनवार, डी.वाय. मरकंटे, सतोष तेलंग, रूपेश श्रीरामवार आदींनी केले आहे.

### कु. हृतिका जन्नावार यांना राष्ट्रपती यांच्या हस्ते सुवर्ण पदक

**हिमायतनगर** -हिमायतनगर शहरातील कु. हृतिका जन्नावार यांना (मास्टर ऑफ ला) एलएलएम ची पदवी उत्तीर्ण झाली. या निमित्ताने सुवर्ण पदक राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या हस्ते दि.३ सप्टेबर रोजी पुणे



येथे पदवीदान सोहळात प्रधान करण्यात आली .राष्टपतीच्या हस्ते पदवी घेणार्या कु.हृतिका जन्नावार ह्य तालुक्यातील पहिल्या आहेत. त्याच्या या यशाबद्दल आ. माधवराव पाटील जवळगावकर, खासदार नागेश पाटील आष्टीकर, परमेश्वर देवस्थान उध्यक्ष माहवीरचंद श्रीश्रीमाळ, आर्यवैश्य समाजाचे तालुकध्यक्ष सुरेश अण्णा पळशीकर, डॉ. सुरेश मामिडवार, डॉ. पुप्पलवाड, डॉ. राजेंद्र वानखेडे, शाम रायवार, कमलाकर दिकतवार, प्रमोद तुप्तेवार यांच्या सह अनेकांनी व शिक्षक वर्गाने कौतुक केले आहे.



**नायगाव- तालुक्यासह नरसी शहर व परिसरात बळी राजाचा उत्सव बैलपोळा उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष संभाजी पाटील भिलवंडे हे नरसी येथे शेतकऱ्यासह बळीराजाची पुजा करताना दिसत आहेत.**

# सोयाबिनच्या शेतात पक्षी थांबे उभारावेत

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०६ सप्टेंबर-**

शेतकऱ्यांनी अळ्या खाणाऱ्या शिकारी पक्ष्यांना थांबण्यासाठी सोयाबीन शेतात विविध ठिकाणी 'ढ' आकाराचे पक्षी थांबे उभारावेत. तसेच विविध किड आणि रोग नियंत्रणासाठी कृषी विभागाच्या सल्लयानुसार विविध उपाययोजना करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी भाऊसाहेब बऱ्हाटे यांनी केले आहे.

तूर पिकावर खोडमाशीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ५ टक्के निंबोळी अर्क किंवा डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १५ मिली प्रती १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. तूर पिकात शेंगा पोखरणारी अळीच्या प्रादुर्भावाचा आगाऊ अंदाज समजण्यासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे ५० मीटर अंतरावर शेतात उभारावेत.

# हिमायतनगर-हदगाव तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा : गजानन तुप्तेवार



**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर, ०६ सप्टेंबर-**

हिमायतनगर-हदगाव तालुक्यातील एक व दोन सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झाली आहे. नदी व नाले ओसोडून वाहत असल्याने महापूर आल्यामुळे कापूस, तूर ,ज्वारी, हळद, सोयाबीन सह अनेक पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शासन दरबारी अतिवृष्टीची नोंद झाली आहे. ग्रामीण भागातील अनेक घरांची पडझड देखील झाली आहे. त्याचे तात्काळ पंचनामे करून हिमायतनगर हदगाव तालुका ओला दुष्काळ जाहीर करावी अशी मागणी तहसीलदार यांना भाजपचे जिल्हा सरचिटणीस गजानन तुप्तेवार यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर पाटील , आशिष सकवान, डॉ. प्रसाद डोंगरगावकर, यल्लप्पा गुंडेवार,राम सूर्यवंशी, परमेश्वर सूर्यवंशी, यासह भाजपचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# पर्यावरणपुरक घरगुती गणपती सजावट स्पर्धेत नागरिकांनी सहभाग घ्यावा : लुंगे

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, ०६ सप्टेंबर-**

गणरायाचे आगमन लवकरच होणार असून गणेश भक्त या क्षणाची वर्षभर वाट पाहत असतात. वर्तमानात आपण सर्वांनी बदलत्या हवामानाची बदलत्या ऋतुचक्राची दखल घेण्यासाठी हा गणेशोत्सव पर्यावरणस्नेही साजरा करणे आणि माझी वसुंधरा पर्यावरण पूरक गणेशोत्सवाची लोकचळवळ उभी करणे ही काळाची गरज असून त्याच अनुषंगाने हदगाव नगरपरिषद ने एक अभिनव असा उपक्रम हाती घेतला असून पर्यावरण पूरक घरगुती गणपती सजावट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धांमध्ये हदगाव शहरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवावा असे आव्हान मुख्याधिकारी नितीन लुंगे यांनी केले आहे.

हदगाव नगर परिषदेमार्फत माजी वसुंधरा ५.० व स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत शहरात पर्यावरण संवर्धन जनजागृती होण्याच्या उद्देशाने शहरातील पर्यावरण पूरक घरगुती गणपती सजावट स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे. यात सहभागी होणाऱ्या नागरिकांनी पर्यावरणाचा संदेश देणाऱ्या या थीमवर ही स्पर्धा आयोजित केली असून या स्पर्धेत भाग घेणाऱ्या नागरिकांनी आपल्या घरगुती गणपती सजावटीचे पर्यावरण पूरक संदेश देणारे याची एक चित्रफित तयार करून ८९९९९६९६४५ या क्रमांकावर पाठवावी यात संबंधित पर्यावरण पूरक संदेशाचे मूल्यांकन करून त्यास योग्य ते गुण देण्यात येतील तसेच यावेळेस सहभागी होणाऱ्या नागरिकांना काही नियम व अटींचे पालन सुद्धा करावे लागतील. या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक ५००० रु., द्वितीय पारितोषिक ३००० रु., तृतीय पारितोषिक २००० रु. असे ठेवण्यात आले असून पर्यावरण बचाव असे संदेश देणाऱ्या घरगुती गणपती सजावट स्पर्धेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा असे आव्हान मुख्याधिकारी नितीन लुंगे यांनी केले.

# पंचनामे न करता ओला दुष्काळ जाहीर करण्याची काँग्रेसची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, ०६ सप्टेंबर-**

मुदखेड तालुक्यात गेल्या बहात्तर तासात झालेल्या अतिवृष्टीमुळे खरीप व बागायती पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातून सर्वच पिके गेली असून आता कुठलेही पंचनामे न करता थेट ओला दुष्काळ जाहीर करून भरीव आर्थिक मदत घोषित करावी या आशयाचे लेखी निवेदन तहसील प्रशासनास काँग्रेसच्या वतीने देण्यात आले आहे.

गेल्या तीन चार दिवसांपासून बारड, मुगट आणि मुदखेड तीन्ही महसूल मंडळात सरासरी पेक्षा दुप्पट पावसाची नोंद झाली आहे नदी नाल्यांना महापूर आला आहे. शेतातील सर्व खरिप पिक खरडून गेले आहेत. या पावसाचा बागायती पिकांनाही याचा मोठा फटका बसला आहे. चार दिवसांच्या संततधार पावसामुळे पिके पिवळे पडली आहेत. हळद, मूग, उडीद, सोयाबीन, कापूस, ऊस, केळी या पिकांना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे शासनाने कुठेही पंचनामे न करता थेट ओला दुष्काळ जाहीर करून सरसगट भरीव आर्थिक मदत द्यावी अशी विनंती मुदखेड तालुका काँग्रेसच्या वतीने करण्यात आली.

यावेळी तालुका काँग्रेस अध्यक्ष प्रतापराव देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे, उपनगराध्यक्ष लक्ष्मणराव देवदे, माजी नगराध्यक्ष राजबहाद्दूर कोत्तावार, करिम खां साहब, जिलाध्यक्ष बालाजी गाढे, शहराध्यक्ष मुजीब पठाण, दादाराव पुयड नागेलीकर, तेजाब पाटील मुंगल, संजयराव सावंत, श्रीनिवास पाटील, राजेश पवार, सूर्यकांत चौदंते, रमेश बोडखे, गिरीश कोतावार, माधव हामंद, मोहम्मद गौस, अतिक अहमद, बालाजी गुळेवाड, गजानन संबोड, संदीप गाढे, भास्कर कळणे, लतिफ टेलर, महेश पवार, हनुमान लखे, शरद पवार, ज्ञाणेश्वर मगरे, तोफीक पिंपळकोठेकर आदी आदींची तहसील कार्यालय येथे उपस्थिती होती.

# किनवट-माहूर तालुक्यातील सरसकट शेतकऱ्यांना तातडीची आर्थिक मदत देण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, ०६ सप्टेंबर-**

किनवट माहूर तालुक्यात दि १ व २ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीसंदर्भात आमदार भीमराव केराम यांनी दि ६ सप्टेंबर रोजी मुंबई गाठून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली व दोन्ही तालुक्यातील नुकसानीची विदारक अवस्था त्यांच्यासमोर मांडून सरसकट शेतकऱ्यांना तातडीने अर्थसाह्य देण्याची मागणी केली या मागणीला देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.

३१ ऑगस्ट पासून किनवट माहूर तालुक्यात मुसळधार पाऊस सुरू आहे. दि १ व २ सप्टेंबर रोजी दोन्ही तालुक्यातील सर्वच महसुली मंडळात अतिवृष्टी झाल्याने हाता तोंडाला आलेल्या उभ्या खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले. प्राथमिक अंदाजानुसार किनवट तालुक्यात ५७७०० हे. तर माहूर तालुक्यातील १८९२० हे. शेतीक्षेत्र बाधित होऊन कापूस सोयाबीन ज्वारी तूर मूग उडीद मका ही पिके जमीन दोस्त झाली आहेत.अनेक शेतकऱ्याचे पशुधन मृत पावले आहेत तर वादळी वाऱ्याच्या पावसात शेकडो घरांची पडझड झाली. या पूर परिस्थितीचा आढावा घेऊन किनवट विधानसभेचे आमदार भीमराव केराम यांनी २ सप्टेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र दिले व दि ६ सप्टेंबर रोजी तातडीने मुंबई



गाठून राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या दालनात भेट घेतली. भेटी दरम्यान आ. केराम यांनी किनवट माहूर तालुक्यातील नुकसानीची अद्यावत माहितीचे निवेदन सादर करून देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केली. चर्चेदरम्यान त्यांनी किनवट विधानसभा क्षेत्रातील सरसकट शेतकऱ्यांना व पडझड झालेल्या घरांना राज्याच्या आपत्ती विभागाकडून अर्थसहाय्य मंजूर करण्याची मागणी केली. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याचे लोकार्पण जनसंपर्क कार्यालयातून सांगण्यात आले आहे.

# विधानसभेसाठी काँग्रेस कडून इच्छुकांची संख्या शतकपार

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०६ सप्टेंबर-**

जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्ह्यातील नऊ विधानसभा मतदारसंघासाठी काँग्रेसने इच्छुकांकडून अर्ज मागितले होते. दरम्यान बदलते राजकीय वारे पाहून जिल्ह्यातील नऊ विधानसभा मतदारसंघातून काँग्रेस उमेदवारीसाठी इच्छुकांची संख्या शतकपार झाली आसून जिल्ह्यातील सर्वच्या सर्व नऊ विधानसभा काँग्रेस लढवू शकते अशी माहिती नांदेड काँग्रेस जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांच्या वतीने देण्यात आली आहे.

महाराष्ट्रातील राजकीय वारे महाविकास आघाडीच्या बाजूने वाहू लागले आहे. यामुळे काँग्रेसच्या उमेदवारीसाठी इच्छुकांची संख्या वाढली आहे. नांदेड जिल्हा देखील यासाठी अपवाद राहिलेला नाही. लोकसभा निवडणुकीच्या नंतर जिल्ह्यातील नऊ विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रेसने इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविले होते. दरम्यान यासाठी जिल्ह्यातील नऊ विधानसभा मतदारसंघातून तब्बल एकशे एक अर्ज, जिल्हा व शहर काँग्रेस कार्यालय येथे आले आहेत. काँग्रेस जिल्ह्यातील, सर्वच्या सर्व नऊ विधानसभा मतदारसंघात चाचपाणी करत आसून सर्व नऊ विधानसभा काँग्रेस लढविण्याची शक्यता आहे. मतदारसंघात काँग्रेस वरचढ असल्याचे चित्र आहे. यात किनवट विधानसभेसाठी ०५, हदगाव विधानसभेसाठी ११, भोकर विधानसभेसाठी १३, नांदेड उत्तरसाठी १६, नांदेड दक्षिणसाठी ०९, कंधार लोहा विधानसभेसाठी ०९, नायगाव विधानसभेसाठी ०६, देगलूर विधानसभेसाठी २४, तर मुखेड विधानसभेसाठी ०८ असे एकूण १०१ जणांनी वरील विधानसभा क्षेत्रातून काँग्रेसच्या उमेदवारीसाठी अर्ज सादर केले आहे. जिल्ह्यातील सर्वच्या सर्व विधानसभा काँग्रेस लढवू शकते अशी माहिती जिल्हा व शहर काँग्रेसच्या वतीने जिल्हाध्यक्ष बी. आर. कदम, दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी दिली आहे.

# कर्जबाजारी शेतकऱ्याच्या मुलाची आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, ०६ सप्टेंबर-**

गाडेगाव ता. जि. नांदेड येथील अल्पभूधारक शेतकरी देवराव उबाळे कर्जाच्या विळख्यात अडकल्याने मुलगा सतीश देवराव उबाळे ( वय २८) याने विष प्राशन केले असून उपचारादरम्यान त्याचा दि.३ सप्टेंबर रोजी उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

सतीश उबाळे स्पर्धा परीक्षेची तयारी करत होता.परंतु स्पर्धा परीक्षेचा निकाल निराशा जनक आल्याने विष प्राशन केले होते. कर्जबाजारी शेतकरी देवराव उबाळे यांनी मुलाच्या शिक्षणासाठी अनेक बँकांचे कर्ज काढले होते. सततची नापिकी तसेच बँकेच्या कर्जाचा तगादा यामुळे कर्ज परतफेडीची धास्ती लागली होती. सतीश उबाळे वडिलावर असलेल्या बँकेच्या कर्जाची धास्ती घेतली होती.

अखेर वडिलांच्या कर्जबाजारीच्या धास्तीने स्वतः विष प्राशन करून जीवन संपविल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. याबाबतची ग्रामीण पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

# सामाजिक सलोखा जपुन गणेशोत्सव साजरा करा: पो.नि.चिंचोलकर

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, ०६ सप्टेंबर-**

राष्ट्रीय सण उत्सव सामाजिक सलोखा म्हणुन साजरे करावेत ,गणपती बाप्पाच्या नावाखाली अवैध धंदे करणाऱ्यांची गय करणार नाही, शांतता समितीच्या बैठकीला मार्गदर्शन करताना पोलिस निरीक्षक ओंमाकांत चिंचोळकर शांतता बैठकिला उद्देशून मार्गदर्शन केले. या बैठकिला तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी माजी नगराध्यक्ष किरण सावकार वट्टमवार, माजी उपनगराध्यक्ष केशवराव मुकादम, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, माजी नगरसेवक भास्कर पाटील पवार, बालाजी खिल्लारे, उल्हास राठोड, महावितरणचे राजु भाऊ, ठाणे अंतर्गत सर्व पोलिस पाटील, जेष्ठ नागरिक, प्रतिष्ठीत व्यापारी ,सर्व गणेश मंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष,महिला पोलिस पाटील यांची उपस्थिती होती.

नांदेड पोलिस परिक्षत्राचे महानिरीक्षक शहाजी उमाप व पोलिस अधीक्षक अविनाश कुमार यांच्या आदेशानुसार तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक ओंमाकांत चिंचोलकर यांनी पोलिस ठाणे आवारात शांतता समितीची बैठक आयोजित केली होती.

आगामी काळातील सण उत्सव शांततेत संपन्न व्हावेत व गौरी गणपती दुर्गा उत्सव, शांततेत साजरे करावेत या उत्सवात कोणी बाधा आणु नये, नवं तरुणांनी व नागरिकांनी सतर्कता बाळगावी. अवैध धंद्याला आळा घालुन अवैध धंदे हादपार पार करावेत, राष्ट्रीय सण, उत्सवात कोणी गैरकृत्याला वाव देऊ नये. संबंधीत गावातील पोलिस पाटीलानी सर्तक राहाणे गरजेचे आवश्यक आहे. कोणी अवैध धंदे करत असेल तर यासाठी पोलिस अधिकाऱ्यांसह पोलिस कर्मचारी आपल्या सेवेत तैनात आहेत याची माहिती द्यावी गाव व परिसरात गैरधंदे,चालत आसतील तर यांची माहिती पोलिस पाटीलानी तात्काळ द्यावी. पोलिस पाटील देत नसेल तर गावातील कोणत्याही व्यक्तींनी माहिती द्या त्याचे नाव गुप्त ठेऊन त्याला कायद्याचा इंगा दाखवला जाईल,

लोहा शहराची सामाजिक संस्कृती चांगली आहे यापुर्वीचा सामाजिक सलोख्याचा आढावा घेतला असता,शहर व परिसरात कुठेही अनुचित प्रकार घडलेल्या गुन्ह्यांच्या नोंदी दिसुन आल्या नाही. यापुढेही कायम असाच सलोखा असावा, जर या काळात कोणावर गुन्हे दाखल असतील तर अशांना या काळात पायबंद करावे लागते परंतु अशी शहराची परिस्थिती दिसुन आली नाही. यामुळे पोलिस प्रशासनात लोहा शहराची चांगली ओळख आहे. गणेश मंडळांनी सामाजिक देखावे सादर करावेत, डीजेच्या आवाजाला शासन बंदी आहे, कमी आवाजाच्या वाजंत्रीचा वापर करावा मिरवणूकीत, लेझिम, ढोल, ताशा बॉन्ड पथकाचा शक्यतो वापर करावा. मुर्तीची विटंबना होणार नाही याची काळजी गणेश मंडळांनी घ्यावी ,महसूल प्रशासन व पोलिस प्रशासनी वेळोवेळी घालुन दिलेले नियमांचे पालन करण्याच्या सुचना यावेळी दिल्या. तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी नवं तरुणांना मार्गदर्शन केले. हुल्लडपणाने झालेला गुन्हा त्यांचे परिणाम व जिवनाला कशी कलाटणी मिळते या संदर्भात नव तरुणण गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या बैठकीला सहाय्यक पोलिस निरीक्षक विस्वदिप रोडे , पाटील, चव्हाण पोलिस कर्मचारी यांची उपस्थिती होती शांतता बैठकीचे आयोजन स्थानिक गुन्हा शाखेचे सदाशिव जामकर यांनी सुनियोजीत केली. सुत्रसंचालन व आभार सहाय्यक पोलिस निरीक्षक पाटील यांनी केले.